# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## मंगळवार, दिनांक २४ मार्च, २०२६
## (सकाळी ०९-४५ ते १०-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **श्री. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"चोपडा शहराची विकास योजना दिनांक २० मे, २०१६ पासून अंमलात आलेली असून सदर योजनेतील रत्नावती नदी लगत असलेल्या क्षेत्रातून पूररेषा दर्शविण्यात आलेल्या असणे, सदर पूररेषेबाबत विकास योजना अहवालामध्ये उच्चतम पूररेषेमधील बांधकामाबाबत किमान २.५ मी. उंचीचे बांधकाम (स्टील्ट) करणेबाबत तरतूद करण्यात आलेली असणे, परंतु सदरची तरतूद ही सन २००६ मध्ये चोपडा शहरातील रत्नावती नदीला आलेला महापूर विचारात घेऊन करण्यात आलेली असणे, सन २००६ पासून ते आजपावेतो चोपडा शहरामध्ये कुठल्याही स्वरुपाचा महापूर आलेला नसणे, त्यानुषंगाने मंजूर विकास योजना अहवालातील उच्चतम पूररेषेमधील किमान २.५ मी. उंचीचे बांधकाम (स्टील्ट) ची अट शिथील करुन मंजूर विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र.३.१.३ नुसार सामान्य पुररेषा व महत्तम पूररेषा मधील क्षेत्रासाठी महत्तम पुररेषेच्या वर ०.४५ मी. उंची ची तरतूद करण्यात येणे, सदरची तरतूद ही चोपडा शहराकरीता सुध्दा गृहीत धरण्यात यावी अशी मागणी होत असणे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार शासनाकडे पाठपुरावा करण्यात येणे, तथापी अद्यापपर्यंत याबाबत कोणतीच निर्णयात्मक कार्यवाही न होणे, परिणामी नागरीकांमध्ये वाढते तीव्र नैराश्याचे वातावरण, शासनाने तातडीने निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री. रईस शेख, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"भिवंडी–निजामपूर शहर महानगरपालिकेमार्फत ४९ शाळा चालवल्या जात असणे,सदर शाळांची अवस्था अत्यंत दयनीय धोकादायक स्थितीत असल्याचे निदर्शनास येणे, C-1 कॅटेगरीतील ७ शाळा बंद असणे व इतर शाळांची दुरुस्ती करणे गरजेचे असणे, याबाबत मानवअधिकार आयोगाने शाळांच्या सद्य:स्थितीबाबत पाठविलेल्या नोटीसा, सोयी-सुविधांचा असलेला अभाव, पाणी वीज, यासारख्या मुलभूत सुविधांपासून वंचित असणे, मनपा शाळांमध्ये विद्यार्थी संख्या घटत असणे,

यामध्ये मोठ्या प्रमाणात विद्यार्थी गळती असणे, तसेच माध्यमिक शाळांची कमतरता असणे, शाळांच्या दुरुस्तीबाबतचा ३० कोटींचा विशेष निधीचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, भिवंडी–निजामपूर शहर महानगरपालिकेने ठराव करुन शाळा दुरुस्ती व नवीन शाळांकरिता खर्च न करण्याचा घेतलेला निर्णय, भिवंडी–निजामपूर शहराची लोकसंख्या पाहता मनपाच्या शाळांची असलेली आवश्यकता, परिणामी शिक्षणाचा दर्जा खालावणे, विद्यार्थी शिक्षणापासून वंचित होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून महापालिकेच्या शाळांच्या दयनीय अवस्थेबाबत लक्ष घालून त्वरित शाळांच्या दुरुस्ती व नवीन शाळा बांधण्याकरिता, सोयी-सुविधा पुरविण्याकरीता निधीची तरतूद करणे, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(३) श्री. राजेश क्षिरसागर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर शहराला मागील अनेक वर्षांपासून विविध नागरी समस्यांनी ग्रासलेले असणे, सन १९७२ साली नगरपालिकेचे महापालिकेत रूपांतर झाल्यानंतर आजतागायत शहराची एक इंचही हद्दवाढ झालेली नसणे, वाढत्या नागरीकरणामुळे शहराशी एकरूप झालेल्या उपनगरांवर मुलभूत सुविधा पुरविण्याचा अतिरिक्त भार महानगरपालिकेवर पडत असणे, सन २०१९ व २०२१ मधील महापुरांमुळे शहराचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे तसेच ब्ल्यू लाईनमुळे नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी मोकळ्या जागांचा अभाव निर्माण होणे, सन १९९८ मध्ये जाहीर झालेल्या सुधारित विकास योजनेतील रिंगरोड, ॲम्यूनिटीज तसेच ओपन स्पेस ताब्यात घेण्याची कामे आजतागायत न झाल्यामुळे शहरातील रस्ते अरुंद होऊन वाहतूक कोंडी व पार्किंगची गंभीर समस्या निर्माण होणे, शहरात मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्यामुळे प्रशासकीय कामकाजावर परिणाम होत असणे, तसेच सेवा प्रवेश नियम शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबित राहणे, पंचगंगा नदी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनणे व काळम्मावाडी थेट पाईपलाईन योजनेतील त्रुटींमुळे शहरातील पाणीपुरवठा वारंवार खंडित होणे, यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण होणे, या सर्व प्रश्नांवर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(४) डॉ. राहूल आहेर, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"एकीकडे गोण्यांच्या कमतरतेचे कारण पुढे करून सामान्य शेतकऱ्यांचा मका खरेदी करण्यास नकार दिला जात असताना, दुसरीकडे चांदवड (जि.नाशिक) तालुक्यातील हिवरखेडे खरेदी केंद्रावर पर तालुक्यातील मका अनधिकृतपणे विकला जात असल्याचा प्रकार माहे मार्च, २०२६ मध्ये उघडकीस आलेला असणे, या कारवाईत मक्याने भरलेल्या सहापैकी पाच ट्रॅक्टरमध्ये महाराष्ट्र शासनाच्या रिकाम्या गोण्याही मिळून येणे, निफाड तालुक्यातील टाकळी विंचूर येथील मका ट्रॅक्टरद्वारे चांदवडच्या हिवरखेडे केंद्रावर आणला असता स्थानिक शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून महसूल विभागाने केंद्रावर छापा टाकला असता, तेथील कर्मचारी आणि खरेदीदार

आधीच पसार झाले असणे, तपासणी दरम्यान ट्रॅक्टरमधील मक्याच्या खाली शासनाच्या हमीभाव केंद्रासाठी राखीव असलेल्या अधिकृत गोण्यांचा मोठा साठा आढळून येणे, या प्रकरणातील दोषी अधिकाऱ्यांवर आणि दलालांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी शेतक-यांनी व सामाजिक संघटनांनी करणे, ट्रॅक्टर चालकांनी आपल्याला या व्यवहाराबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगणे, ज्यामुळे यामागे मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे स्पष्ट होत असणे, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) श्री. आनंद तिडके, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबईतील चुनाभट्टी परिसरात ‘ऑर्किड स्कूल’ नावाची शाळा शिशुवर्ग ते इयत्ता सातवीपर्यंत सुरू असणे, सदर शाळा आवश्यक असलेल्या ओ.सी. (Occupation Certificate) तसेच अग्निशमन दलाच्या परवानगीविना राजरोसपणे सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत असणे, संबंधित शाळा व्यवस्थापनाद्वारे पालकांकडून अवाढव्य फी आकारणी करूनही आवश्यक कायदेशीर परवानग्या न घेता शाळा चालवली जात असणे, सदर शाळेमध्ये हजारोंच्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत असल्याने भविष्यात कोणतीही दुर्घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याची भीती निर्माण होणे, तसेच संबंधित मनपा ‘एल’ विभागातील प्रशासनाने या गंभीर प्रकाराकडे दुर्लक्ष केल्याचे दिसून येणे, काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने नियम डावलून शाळा सुरू ठेवली जात असल्याचा संशय व्यक्त केला जात असणे, त्यामुळे या प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर खातेनिहाय कारवाई करावी व सदर अनधिकृत शाळेवर तात्काळ बंदीची कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(६) श्री. योगेश सागर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पवार पब्लिक स्कूल, कांदिवली (प.) मुंबई-६७ येथे शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत २५% आरक्षण (Section १२ (१) (c)) अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांकडून वह्या, पुस्तके, गणवेश, लेखन साहित्य व इतर शैक्षणिक साहित्याकरिता शाळा प्रशासन शुल्क मागणी करीत असणे, शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ तसेच महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार (GR) आरटीई अंतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत शिक्षण देणे बंधनकारक असणे, यामध्ये वह्या, पाठ्यपुस्तके, गणवेश, लेखन साहित्य इत्यादी शैक्षणिक साहित्याचा समावेश असणे, अशा विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क, देणगी किंवा साहित्याकरिता पैसे मागणे हे आरटीई कायद्याचे उल्लंघन असणे. तरीसुधा शाळा प्रशासन पालकांना सदर शुल्क भरण्यासाठी व पालकांवर दबाव आण्यासाठी एक-एक पालकांना मुख्य अध्यापिकेच्या केबिनमध्ये बोलाऊन फॉर्मवर त्यांच्या सह्या घेऊन पैसे भरल्याशिवाय वह्या-पुस्तके, गणवेश व शैक्षणिक साहित्य दिले जाणार नाही असे सांगून अनेक पालकांना परत पाठविण्यात येणे,

ही कृती अत्यंत गंभीर व आरटीई कायद्याचे उल्लंघन करणारी असणे, या प्रकारामुळे आरटीई विद्यार्थ्यांच्या पालकांना मानसिक त्रास सहन करावा लागत असून आर्थिकदृष्ट्या दुर्बल, मागास घटकातील मुलांच्या शिक्षणाच्या मूलभूत अधिकारावर गदा येत असणे, याबाबत शासनाने शाळा प्रशासनास सूचना देऊन आरटीई अंतर्गत प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांना वह्या-पुस्तके, गणवेश व शैक्षणिक साहित्य त्वरित देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) सर्वश्री. संतोष दानवे, नारायण कुचे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील शेतकऱ्यांचे दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे सोलर पॅनलचे प्रचंड नुकसान झालेले असणे, यामध्ये प्रामुख्याने मदन विठ्ठल कुलवान यांच्या शेतातील सहा सोलर पॅनल फुटणे आणि दीपक शितल डोबाल यांच्या शेतातील सात पॅनल तुटल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झालेले असणे, सदर नुकसानीबाबत संबंधित सीआरआय कंपनीने माहे सप्टेंबर महिन्यात पंचनामा करून क्लेम दाखल केला असला तरीही आता कंपनीकडून नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करण्यात येत असणे, शेतकऱ्यांना क्लेम रिजेक्ट झाल्याचे तोंडी सांगून त्यांची दिशाभूल व फसवणूक केली जात असणे, या गंभीर बाबीवर भोकरदन महावितरण उप अभियंता कार्यालयात बैठक होऊन कंपनीला सूचना दिल्यानंतरही आणि कंपनीने भरपाई देण्याचे मान्य करूनही अद्याप प्रत्यक्ष मदत मिळालेली नसणे, भोकरदन तालुक्यातील अनेक गावांमध्ये विविध सोलर कंपन्यांबाबत अशाच स्वरूपाच्या तक्रारींची व्याप्ती मोठी असणे, यामुळे शासनाच्या सौर ऊर्जा योजनेच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संताप असणे, तरी शासनाने या प्रकरणी तातडीने हस्तक्षेप करून संबंधित कंपन्यांना कडक निर्देश देणे, बाधित शेतकऱ्यांना तत्काळ नुकसान भरपाई मिळवून देणे आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या कंपन्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करून सौर ऊर्जा प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर सनियंत्रण समिती नेमण्याची प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) सर्वश्री. राजेश पवार, किसन कथोरे, समाधान आवताडे, प्रविण दटके, प्रताप अडसड, विक्रम पाचपुते, राजन नाईक, करण देवतळे, मोहन मते, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे माहिती तंत्रज्ञान मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात गेल्या काही वर्षात लहान मुले व किशोरवयीन मुलांकडून होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याचे विविध अहवालांमधून दिसून येणे, मोबाईल फोन, सोशल मीडिया प्लॅटफॉर्म तसेच विविध ऑनलाइन गेम्सचा अति व अनियंत्रित वापर याचा मुलांच्या मानसिकतेवर विपरीत परिणाम होणे, तसेच ऑनलाइन गेम्स, हिंसक डिजिटल कंटेंट किंवा सोशल मीडियावर प्रसिद्धी मिळविण्याच्या हव्यासामुळे मुलांकडून मारामारी, सायबर गुन्हे, चोरी, ब्लॅकमेलिंग, सायबर बुलिंग तसेच इतर

गंभीर गुन्हे घडत असणे, त्यामुळे मुलांचे मानसिक आरोग्य, सामाजिक वर्तन तसेच कायदा-सुव्यवस्था यावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात असणे, या पार्श्वभूमीवर कर्नाटक व आंध्रप्रदेश राज्यांनी सोळा वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर निर्बंध आणण्याबाबत कायदे किंवा धोरणात्मक उपाययोजना करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती प्रसारमाध्यमांतून समोर आलेली असणे, महाराष्ट्र राज्यातील अल्पवयीन मुलांकडून झालेल्या गुन्ह्यांपैकी अनेक गुन्हे सोशल मीडिया, ऑनलाइन गेम्स किंवा इंटरनेट वापराशी संबंधित असणे, शाळा, पालक व समाजामध्ये डिजिटल साक्षरता व जनजागृतीसाठी शासनाकडून काही विशेष मोहीम राबविण्याची आवश्यकता, कर्नाटक व आंध्र प्रदेश राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही सोळा वर्षाखालील मुलांच्या सोशल मीडिया वापरावर काही निर्बंध आणण्यासाठी कायदा किंवा धोरण आणण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) सर्वश्री. नरेंद्र भोंडेकर, नाना पटोले, संजय मेश्राम, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"गोसेखुर्द प्रकल्पामध्ये पूर्ण संच जलसाठा २४५.५०० त.मी. ने बाधित होणाऱ्या भंडारा विधानसभा मधील खमारी, खापा (अजिमाबाद), मुजबी, (दवडीपार बेला), दाभा, गणेशपुर, भोजापुर, सालेबर्डी, कारधा, तिड्डी, निमगाव, अर्जुनी टोली, मेंढा, कोरंभी देवी, बेला, कोथुर्णा, खैरी, पेवठा, कोंढी, कवडशी, बेरोडीटोला, करचखेडा, जमनी, लोहारा, भंडारा खास, पाहूनगाव, इटगाव, कुर्झा, खमाटा, बेटाळा, सुरबोडी, बोरगाव बुज, टोली या ३२ गावांच्या पुनर्वसनासाठी नवीन भूसंपादन कायदयानुसार शासनास अद्यापही प्रस्ताव सादर करण्यात आलेला नसणे, तसेच मोबदलाही देण्यात आलेला नसणे, २०८८ हेक्टर शेती जमीन संपादीत करून आर्थिक मोबदला देण्यात यावा, पुर्णः बाधित प्रमाणे अंशतःबाधित प्रकल्पग्रस्तांना कृषी मजुरी एकमुस्त रक्कम देण्यात यावी, गोसेखुर्द प्रकल्पामध्ये अंशतः बाधित होणाऱ्या गावांचे जलसंपदा विभागामार्फत रेड अॅन्ड ब्लु ड्रोन सर्वेक्षणाच्या कामासाठी ९८ लाख रुपये निधी मंजूर झालेला असतानासुध्दा सर्वेक्षणाचे काम अपूर्ण असणे, प्रकल्पग्रस्तांना दिनांक १९ जानेवारी, २०२५ च्या (जीआर) मध्ये अटी शिथिल करून पूर्वीप्रमाणे प्रमाणपत्र देण्यात यावे यासह अनेक मागण्यांचे निवेदन ३२ गावातील प्रकल्पग्रस्त यांनी करणे, मात्र याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे त्यांच्यात पसरत असलेला तीव्र असंतोष, या ३२ गावातील पुनर्वसन व नवीन कायाद्यानुसार प्रकल्पग्रस्तांना आर्थिक मोबदला मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री.श्याम खोडे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वाशिम जिल्ह्यातील सन २०२४-२५ व २०२६ मध्ये सोयाबीन, तूर, कापूस तसेच शेती मालाचे गोदाम, गुरांचे गोठे इत्यादींना आग लागण्याच्या अनेक घटना घडलेल्या असणे, सदर घटनांचे पंचनामे होऊन आर्थिक सहाय्य मिळण्याबाबतचे

प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडून शासनाकडे पाठविलेले असणे, सदर प्रकरणे आपत्ती व्यवस्थापनामध्ये समाविष्ट नसल्यामुळे यावर अनेक महिने होऊनसुद्धा या प्रकरणाबाबत कुठलीही कार्यवाही न होणे, शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई ही जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावरच होऊन त्यांना नुकसान भरपाईची रक्कम मिळण्याबाबतची मागणी शेतकरी वर्गातून वारंवार होणे, परंतु यावर शासनाने कुठल्याही प्रकारची कार्यवाही न करणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्या बाबतची शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(सकाळी ११-०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

(१) **मुख्यमंत्री** : **(क)** दिनांक १३.०५.२०२४ रोजी घाटकोपर येथील बेकायदेशीर फलक कोसळल्यामुळे झालेल्या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्यासाठी श्री.दिलीप बी. भोसले, माजी मुख्य न्यायाधीश, अलाहाबाद उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय चौकशी समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) अधिनियम, २०१८ च्या कलम ४६ च्या पोट-कलम (३) मधील तरतुदीनुसार "श्री शनैश्वर देवस्थान विश्वस्तव्यवस्था (शिंगणापूर) नियम, २०२५" प्रसिध्द करण्याची अधिसूचना क्रमांक श.दे.वि - २२२५/प्र.क्र. १५०/कार्य - १६, दिनांक १२ डिसेंबर, २०२५ सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(क)** निकमार विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

: **(ख)** डीईएस विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२३-२०२४ व सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** विजयभूमी विद्यापीठ, रायगड यांचा सन २०१९-२०२० ते सन २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(३) **महिला व बाल विकास मंत्री** : **(क)** महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करणे.**

**चार : विधानसभा आश्वासन समितीचा पहिला अहवाल सभागृहास सादर करणे.**

**पाच : विनंती अर्ज सादर करणे -**

**श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** : "चंद्रपूर शहरातील झरपट नदीचे तातडीने पुनरुज्जीवन करण्याबाबत" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहाला सादर करतील.

**सहा : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये)**

**सात : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

**(बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक - १ )**

(१) **श्री. संग्राम जगताप, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"अहिल्यानगर जिल्ह्यातील पारधी समाजसेविका सुमन काळे यांचा माहे मे, २००७ मध्ये पोलीस कोठडीत संशयास्पद मृत्यू झालेला असणे, प्रारंभी सदर प्रकरणात आत्महत्येची नोंद केलेली असणे, परंतु उपविभागीय दंडाधिकारी यांच्या चौकशीत सुमन काळे यांना पोलीसांनी अमानूष मारहाण करून शारीरिक व मानसिक त्रास दिल्याने दुर्देवी मृत्यू झाल्याचे स्पष्ट होणे, सदर प्रकरणाचा तपास राज्य गुन्हे अन्वेषण विभाग यांच्याकडे वर्ग करूनही आजपर्यंत सदर विभागाने कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नसणे. मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर काही आरोपींवर गुन्हे दाखल झालेले असणे, मात्र सदर आरोपींवर खुनाऐवजी आत्महत्येस प्रवृत्त केल्याची कलमे लावलेली असणे, तसेच सदर प्रकरणातील एका खाजगी डॉक्टराला मा. उच्च न्यायालयाने दिलासा दिल्यानंतर, संबंधित विभागाने या विरूध्द मा. सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केलेले नसणे, आज रोजी सदर प्रकरण मा. जिल्हा व सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे प्रलंबित असणे, सदर प्रकरणाच्या तपासाबाबत अनुसूचित जाती-जमाती आयोगानेही नाराजी व्यक्त केलेली असणे, या पार्श्वभूमीवर सदर प्रकरणात तात्काळ स्वतंत्र विशेष तपास पथक (SIT) स्थापन करून प्रकरण सीआयडीकडून

SIT कडे वर्ग करणे, अ‍ॅट्रॉसिटी कायद्यान्वये योग्य कलमवाढ करणे, तसेच मयत सुमन काळे व त्यांचे कुंटूंबिय यांना न्याय देण्यासाठी प्रकरणातील न्यायप्रक्रिया गतिमान करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री. बाबुराव कदम - कोहळीकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"चिचोरडी रोड, हिमायतनगर, जि.नांदेड येथे HVDS १ × १६ KVA रोहित्र अनधिकृतरित्या व महावितरण कंपनीच्या नियमांविरुद्ध बसविण्यात आलेले असणे, याबाबत वडगाव यांनी वरिष्ठांकडे वारंवार तक्रारी करणे, तथापि कोणतीच कार्यवाही न केल्याने दिनांक ३ फेब्रुवारी, २०२६ पासून महावितरणच्या उपविभाग कार्यालय, हिमायतनगर समोर आमरण उपोषण सुरू असणे, उपोषणकर्त्यांकडून देखभाल-दुरुस्ती, नवीन विद्युत खांब उभारणी, विद्युत लाईन स्थलांतर इत्यादी विविध मागण्या करण्यात येणे, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२६ रोजी भोकर विभाग कार्यालयातील अधिकारी व संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेऊन त्वरित कार्यवाही करण्याचे आश्वासन देणे, तद् नंतर अनधिकृत HVDS १ x १६ KVA रोहित्र व संबंधित लाईनचे कंडक्टर काढून टाकणे, तसेच सदर प्रकरणी सक्षम समितीमार्फत सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या लागू असलेल्या सेवा नियमांनुसार कठोर शिस्तभंगात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन देणे, तथापि अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई न होणे, आमरण उपोषण अद्यापही सुरूच असणे, शासनाने सदर प्रकरणाची पारदर्शक चौकशी करून दोषी असलेल्यांवर त्वरित कारवाई करण्याची तसेच उपोषणकर्त्यांच्या मागण्यांवर निर्णयात्मक कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(३) श्री. किशोर पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजी (ग्रीडला जोडलेली परस्पर-सक्रीय छपरावरील नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा) (दुसरी सुधारणा) काढण्यात येणे, यामध्ये छपरावरील ऊर्जा निर्मिती सुलभ करणे, प्रक्रीया जलद करणे आणि हरित ऊर्जा प्रसाराला चालना देणे हा मुख्य उद्देश असणे, तसेच १० केव्ही पर्यंतच्या निवासी छप्परावरील ऊर्जा निर्मिती अर्जांना पहिले प्राधान्य देण्याची तरतूद करण्यात आली असून अर्ज पूर्ण असल्यास वितरण कंपनीने तांत्रिक अडचणी न पाहता तो स्वीकारावा अशी स्पष्टपणे तरतूद करण्यात येणे, यावरुन असे स्पष्ट होते की, सौर ऊर्जा निर्मिती व त्याचा वापर राज्यात जास्तीत जास्त होण्याकरीता विशेष प्रयत्न करण्याच्या हेतूने हा अध्यादेश काढण्यात येणे, देशातच नव्हेतर राज्यातही मोठया प्रमाणावर वायूप्रदूषण रोखण्याकरिता इलेक्ट्रिक वाहनांचा प्रसार होत असणे, गॅस वा चुलीवरील स्वयंपाकाकडून इंडक्शन कुकिंगकडे शहरासह ग्रामीण भागातही वापर होत असणे, शासकीय-खाजगी

कार्यालयात वातानुकूलित यंत्रणेचा होत असलेला वापर, वर्क फ्रॉम होममुळे घरगुती वीज वापराचा लोड वाढत असणे, असे असतांनाही महावितरण कंपनीकडून मागील १२ महिन्यांच्या वीज वापरावर आधारित सौर क्षमतेवर मर्यादा लावली जात असणे, अशा परिस्थितीत सौर प्रणालीचे आकारमान भूतकाळातील वापरावर आधारित ठरविणे म्हणजे भविष्यातील ऊर्जा गरजा नाकारण्यासारखे असणे, परिणामी राज्यात भविष्यात वीजेचा भासणारा तुटवडा पाहता शासनाने तातडीने महावितरण कंपनीला दिनांक २९ ऑगस्ट, २०२४ रोजीच्या अधिसूचनेची ठोसपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(४) श्री. मंगेश कुडाळकर, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"कुर्ला नेहरू नगर म्हाडा वसाहतीमध्ये १९ इमारती पोलीस वसाहत असणे, या १९ इमारती जीर्ण झालेल्या असून यांचा पुनर्विकास होणे अत्यंत आवश्यक असणे, या इमारतींचा पुनर्विकास म्हाडा प्राधिकरणामार्फत करून यातून नव्याने उपलब्ध होणाऱ्या सदनिकांमध्ये या ठिकाणी वर्षानुवर्ष राहत असलेले पोलीस बांधव यांना हक्काचं घर मिळावे या दृष्टीने माफक दरात घर उपलब्ध करावे अशी पोलिस पत्नींची मागणी असणे, या मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या बैठकीत मुंबईतील म्हाडा अभिनयासात असलेल्या १७ पोलीस वसाहतींचा एकत्रित पुनर्विकास करून प्रस्ताव सादर करावा असे निर्देश देणे, परंतु सदर प्रस्ताव अद्याप प्रलंबित असणे, तसेच दिनांक १ जानेवारी, २०२६ रोजी गृहनिर्माण विभागाच्या शासन निर्णयाद्वारे मुंबई पोलीस दलातील शासकीय निवासस्थानात रहात असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना मालकी स्वरूपाची घरे देता येतील काय याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी समिती गठन करणे, या समितीची बैठक दिनांक २० फेब्रुवारी, २०२० रोजी होणे, सदर बाबींमध्ये अद्याप कोणताही निर्णय न झाल्याने विभागातील पोलीस पत्नी यांनी याबाबत सातत्याने मागणी करणे, याबाबत  शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(५) सर्वश्री. अमिन पटेल, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, डॉ. विश्वजित कदम, श्री. नाना पटोले, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. नितिन राऊत, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्री (गृहनिर्माण) यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबादेवी विधानसभा क्षेत्रात कामाठीपुरा परिसर असणे, या परिसरात मध्यमवर्गीय बहुभाषिक लोकांची वस्ती असणे, या विभागात अनेक जुन्या व जीर्ण चाळी असणे, त्यामुळे या विभागातील इमारतींचा लवकरात लवकर पुनर्विकास व्हावा अशी स्थानिकांची मागणी असणे, कामाठीपुरा विकास समितीच्या माध्यमातून पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनास सादर होणे, त्यावर वास्तुविशारदाची नियुक्ती करीत निविदा काढण्यात येणे, कामाठीपुरा पुनर्विकास प्रक्रियेस गती मिळणे आवश्यक असणे, पंतप्रधान अनुदान प्रकल्पाच्या (पीएमजीपी) बहुतांश

इमारती या उमरखाडी, कामाठीपुरा विभागात असणे, छताचा भाग कोसळणे, पाणी गळती, घरांच्या भिंतीची पडझड होणे यासारख्या प्रकारांमुळे येथील रहिवाशी आपला जीव मुठीत घेऊन राहणे, या इमारतींच्या पुनर्विकासाच्या प्रकल्पाला गती मिळावी याकरीता अनेक बैठका शासन स्तरावर होणे, परंतु अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, डोंगरी, भेंडीबाजार पायधुनी, भुलेश्वर, नळबाजार, काळबादेवी, मोहम्मद अली रोड हा परिसर सतत गजबजलेला असणे, या परिसरात अनेक जुन्या व जीर्ण इमारती असणे, यामुळे म्हाडाने येथील इमारतींचे सर्व्हेक्षण करून व बेकायदा बांधकामे तपासून येथील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करण्याची गरज निर्माण झालेली असणे, परंतु या सर्व्हेक्षणासाठी म्हाडाकडे कर्मचारी वर्गाचा तुटवडा असणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरत असलेला असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(६) श्री. राजेश बकाने, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"वर्धा जिल्ह्यातील पुलगाव येथील हिंगणघाट फैल परिसरातील जुना सर्व्हे क्र. ३६९, क्षेत्रफळ ११.२५ एकर ही जमीन शासकीय उपलब्ध नोंदीनुसार पूर्वीपासून परावर्तित जमीन म्हणून नोंद असणे, दशकापूर्वी मान्यताप्राप्त ले-आऊट विविध शासकीय अभिलेखांवर नोंद असणे, या परिसरात सुमारे ४०० कुटुंबे मागील ८० ते १०० वर्षांपासून वास्तव्यास असणे, संबंधित नागरिकांकडून आजपर्यंत नियमितपणे नगरपरिषदेकडे मालमत्ता कराचा भरणा करण्यात आलेला असणे, विक्रीपत्र, दानपत्र व इतर व्यवहार उपनिबंधक कार्यालयामार्फत सुरळीतपणे नोंदविण्यात येत असणे, असे सर्व कायदेशीर व्यवहार सुरू असताना सन २०१३ मध्ये जिल्हाधिकारी, वर्धा यांनी सदर जमिनीवरील व्यवहारांवर स्थगिती देणारे पत्र निर्गमित करणे, परिणामी नगरपरिषदेकडून अनेक दशकांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांना अतिक्रमणकर्ता घोषित करणे, त्यांच्या मालकी हक्कांवर व निवाऱ्यावर अनिश्चितता निर्माण होणे, स्थावर मालमत्तेची खरेदी-विक्री पूर्णपणे ठप्प होणे, बँक कर्ज, बांधकाम परवाने व वारस नोंदी प्रलंबित राहणे, नागरिकांमध्ये भीती व असंतोष पसरलेला असणे, सदर स्थगिती हटविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या निवेदनानुसार मा. महसूल मंत्री यांनी दिनांक ७ डिसेंबर, २०२५ रोजी जिल्हाधिकारी, वर्धा यांना निर्देश देऊनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही न होणे, यामुळे नागरिकांवर गंभीर अन्याय होत असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(७) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जुहू येथील प्लॉट क्र.३५-सी/१, सी.टी.एस. क्र. १०७०,१०७१/१ व १०७१/२ या मिळकतीचे सह दुय्यम निबंधक, वर्ग-२ मुंबई-३१, यांच्या कार्यालयात त्यांच्या संगनमताने दिनांक १० जून, २०२५ रोजी दस्त क्र. मुं. ३१/१४५७३/२०२५ नोंदविण्यात आलेली असणे, दस्तातील मिळकत मूळत: नसरवानजी दोराबजी

सिरवाई व मेहरबानू नसरवानजी सिरवाई ( दोघेही मयत) यांच्या नावे असणे, सदर मिळकत मयत ॲडमिनीस्ट्रेटर दोराब फुरदुनजी सिरवाई यांच्या पश्चात बनावट कुलमुखत्यार पत्राव्दारे श्री. विद्याधर सिताराम राव यांनी त्यांच्या स्वत:च्याच नावावर केलेली असणे, सदर कुलमुखत्यार पत्र बनावट व निरस्त असल्याचे निदर्शनास आलेले असणे, याबाबत चेंबूर, पोलीस ठाणे, मुंबई येथे तक्रार झालेली असणे, सह दुय्यम निबंधक वर्ग-२ मुंबई-३१, यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे चुकीचे मुद्रांक शुल्क आकारून शासनाचे केलेले नुकसान, अशा गैरप्रकारे नोंदविलेल्या अनेक प्रकरणात शासनाचे शेकडो कोटींचे मुद्रांक शुल्काचे झालेले नुकसान, सह दुय्यम निबंधक वर्ग-२, मुंबई-३१, यांच्या विरूध्द भ्रष्टाचाराचे असलेले अनेक आरोप, यामुळे पुण्यातील मुंढवा मुद्रांक शुल्क घोटाळ्याच्या धरतीवर सह दुय्यम निबंधक वर्ग-२, मुंबई-३१ व त्यांचे सहकारी यांच्या चौकशीची आवश्यकता, त्यांनी त्यांच्या काळात नोंदविलेल्या सर्व दस्तांची चौकशी करून शासनाच्या शेकडो कोटी रूपयांच्या महसूलाची वसूली होण्याची गरज, अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रीया."

**(८) श्री. चंद्रकांत निंबाजी पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"तापी पूर्णा साखर कारखाना मर्यादित, मानपूर (रजि. क्र. १५४२१, दि. १०.०५.२००१) या संस्थेच्या नावाखाली भुसावळ तालुक्यातील मानपूर येथील गरीब शेतकऱ्यांकडून सुमारे ३५ हेक्टर जमीन कारखाना उभारण्याच्या उद्देशाने घेण्यात आली असणे, मात्र २५ ते २८ वर्षे उलटूनही या जमिनीवर कोणताही साखर कारखाना उभारण्यात आलेला नसणे, कारखान्याच्या नावाखाली घेतलेली ही ३५ हेक्टर जमीन (गट क्र. १६, १७, १८, १९, ११९, १२२, १२३ इ.) कोणत्याही शासकीय पूर्व परवानगीशिवाय आणि नियमांचे उल्लंघन करून एकाच राजकीय कुटूंबातील सदस्यांच्या नावे खरेदी करण्यात आली असणे, यात 'महार वतन' जमिनींचाही समावेश असून त्यांची विल्हेवाट लावताना कायदेशीर प्रक्रिया डावलण्यात आलेली असणे, जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिनांक १०.२.२०२६ रोजी अपर मुख्य सचिव (महसूल) यांना सादर केलेल्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे की, गट क्र. १२२ सह अन्य जमिनींच्या खरेदी व्यवहारात गंभीर त्रुटी असून शासनाची परवानगी न घेता या जमिनी स्वतःच्या कुटूंबाच्या नावे केल्या गेल्या असणे, २५ वर्षे कारखाना न उभारता शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या या संचालक मंडळावर सरकारने फौजदारी गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, जिल्हाधिकाऱ्यांच्या अहवालाची दखल घेऊन सदर ३५ हेक्टर जमीन पुन्हा मूळ शेतकरी किंवा शासनाच्या नावे करण्यासाठी शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता, या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती पाहता शासनाने याची एसआयटी (विशेष चौकशी पथक) मार्फत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(९) श्रीमती देवयानी फरांदे, श्री. नितीन पवार, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"प्रधानमंत्री आवास योजना ही महत्त्वकांक्षी योजना सुरु असणे, १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असणाऱ्या महानगरांमध्ये राज्य शासनाकडून दिनांक ०८/११/२०१३ पासून ही योजना सुरु असणे, नाशिक शहरात सदर योजनेची अंमलबजावणी प्रभावीरित्या होत नसणे, काही बांधकाम व्यवसायिक यांनी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून खोटे मोजणी नकाशे व सातबारा उतारे तयार करणे, भूखंडाचे ४००० चौरस मीटर पेक्षा कमी तुकडे करून गोरगरीब नागरिकांना योजनेपासून दूर ठेवणे, दिनांक २९/०३/२०२२ रोजी मा. सभापती, विधानपरिषद, यांनी म्हाडा व नाशिक मनपा या विभागांची संयुक्त बैठक घेऊन म्हाडा कार्यालयाची NOC घेण्याबाबत आदेश दिलेले असणे, मा.सभापती व मा.उपमुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशांच्या विपरीत दिनांक २०/०१/२०२५ रोजी मनपा आयुक्त यांनी निर्देशांचे पालन करण्याची आवश्यकता नसल्याच्या आशयाचे परिपत्रक जारी करणे, महसूल विभागाच्या पुढाकाराने अनेक गरीब व गरजू नागरिकांना घरकुल मिळण्यात अडचणी निर्माण करणे,गोरगरिबांच्या घरकुलांमध्ये महसूल व नाशिक महानगरपालिका अधिकारी यांच्या संगनमताने सुरू असलेला भ्रष्टाचार, शासनाचे सदर बाबीकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**(१०) श्री. राघवेंद्र पाटील, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मनमाड ते इंदौर या ३५० कि.मी. रेल्वे मार्गाचे भुसंपादन होणे, पहिला टप्प्यात बोरविहीर ते नरडाणा या ५० कि.मी. अंतराचे भुसंपादन झालेले असणे, या ५० कि.मी. अंतरात धुळे व शिंदखेडा तालुक्यात सुमारे १ हजार शेतकऱ्यांच्या जमिनी संपादीत होणे, सदर शेतकऱ्यांना अतिशय कमी भावाने म्हणजे ४ लाख ते ८ लाख रुपये हेक्टरी या दराने मोबदला देणे, या आधी धुळे जिल्ह्यातील मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग, नागपुर-सुरत राष्ट्रीय महामार्ग व धुळे-सोलापुर राष्ट्रीय महामार्ग ह्या तीनही महामार्गांच्या भुसंपादन मोबदला ५६०० ते ९००० रुपये चौ.मि.ने दिलेला असणे, रेल्वेत भूसंपादीत शेतकऱ्यांना सदर मार्ग १५ ते २० फुट उंच असल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणे, शेताचे दोन भाग होणार असुन मध्य भागातून रेल्वेमार्ग जात असल्याने शेतकऱ्यांनी उर्वरीत जमीन कशी कसावी यामुळेही शेतकऱ्यांच्या मनात मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण होणे, राष्ट्रीय महामार्गाप्रमाणे रेल्वे भूसंपादित शेतकऱ्यांना चौरस मिटर प्रमाणेच मोबदला देणे, सर्व बाधित शेतकऱ्यांना लवकर व योग्य मोबदला मिळण्यासाठी जिल्हाधिकारी यांची लवाद अधिकारी म्हणून नेमणूक होणे, लवादात सुमारे ७०० प्रकरणे दाखल असून संदर्भित प्राधिकारी स्तरावर दोन वर्षापासून प्रकरणे प्रलंबित असणे, सदर बहुआयामी प्रकल्पास शेतकऱ्यांचा विरोध नसणे, परंतु भूसंपादित झालेल्या शेतकऱ्यांवर अन्याय होणे, पुढील टप्प्यातील शेतकरी आधीच्या शेतकऱ्यांना न्याय

दिल्याशिवाय पुढील मनमाड ते इंदोर प्रकल्पात जमीन संपादनास विरोध कायम होऊ शकणे व आधी संपादीत जमीनीचा लवाद अधिकारी जिल्हाधिकारी यांनी चौरस मिटरने मोबदला जाहीर करणे व पुढील टप्प्यातील जमीन संपादीत करणे, प्रकल्पात जमिनी संपादीत होणाऱ्या शेतकऱ्यांच्या मुलांना रेल्वेत व शासकीय नोकरी देण्याची आवश्यकता, बागायती क्षेत्र असतांना सरसकट जिरायती मोबदला दिला अशा शेतकऱ्यांना बागायती दराने मोबदला देणे, सन २०१३ चा कायदा असल्यावर २००८ च्या कायदयानुसार शेतकऱ्यांना मोबदला देणे, सदरील शेतकरी बांधवांना न्याय देण्यासाठी राष्ट्रीय महामार्गातील संपादित चौरस मीटर जमिनीप्रमाणे मोबदला देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : अल्पकालीन चर्चा (म.वि.स. नियम १०१ अन्वये) :-**

**(सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या म.वि.स. नियम १०१ अन्वये अल्पकालीन चर्चेच्या सूचना)**

**(१) सर्वश्री. संजय केळकर, निलेश राणे, शेखर निकम, प्रशांत ठाकूर, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात कोकण विभागाला (रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) लाभलेले नैसर्गिक सौंदर्य, समुद्रकिनारे, डोंगररांगा आणि सांस्कृतिक वैशिष्टयांमुळे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण केंद्र ठरले असणे, कोकणात विशेषतः मुख्यमंत्री कृषी आणि अन्न प्रक्रिया योजना, फळ प्रक्रिया योजना, अन्न प्रक्रिया उद्योग इत्यादींना कृत्रिम बुध्दिमतेची सांगड घालून काजु बोंडापासून अल्कोहोल निर्मिती, आंब्यासारखे नगदी व निर्यातक्षम उत्पन्न व मच्छिमारी इत्यादींमुळे रोजगार निर्मिती झाली असणे, अपूर्ण पायाभुत सुविधा, वारंवार होणारी पूरस्थिती, औद्योगिक गुंतवणूकीचा अभाव व युवकांचे स्थलांतर या प्रमुख आव्हानांना सामोरे जाण्यासाठी कोकण विकास आराखडा तयार करण्याची आवश्यकता, देशी गोवंश संवर्धन, 'कोकण कपिला' प्रसार व ब्रिडींग सेंटरसाठी विशेष अनुदान देण्याची आवश्यकता, कोकण कृषी विद्यापीठांतील रिक्त पदे भरण्याची आवश्यकता, या विद्यापीठांतर्गत पदव्युत्तर कृषी शिक्षण संस्था स्थापन करण्याची आवश्यकता, आसाम राज्याच्या धर्तीवर सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये किमान १० टक्के बांबु उत्पादन आरक्षित करण्याचे धोरण राबविण्याची आवश्यकता, मुंबई-गोवा महामार्गाचे उर्वरित काम पुढील १ वर्षात पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासनाने कालबध्द कार्यक्रम जाहिर करण्याची आवश्यकता, या महामार्गावर प्रत्येक २५ कि.मी. अंतरावर ट्रॉमा केअर सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता, नर्सिंग कॉलेज आणि मरिन टॅक्नोलॉजी कॉलेज सुरु करण्याची आवश्यकता, कोकणातील धार्मिक स्थळांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता, वन्यजीव प्राण्यांपासून शेतीचे नुकसान टाळण्यासाठी सह्याद्री संवर्धन प्रकल्प पूर्ण क्षमतेने राबविण्याची आवश्यकता, डोंगराळ भागातील पाण्याचे व्यवस्थापन करण्याची आवश्यकता, सौरऊर्जेचे प्रलंबित प्रस्ताव तातडीने निकालात काढण्याची आवश्यकता, आयटी पार्क उभारुन युवकांसाठी स्थानिक पातळीवर

रोजगार उपलब्ध करण्याची आवश्यकता, अत्याधुनिक सुपर स्पेशालिटी रुग्णालय शासन स्तरावर उभारण्याची आवश्यकता, आपत्कालीन परिस्थितीसाठी एअर ॲम्बुलन्स सेवा सुरु करण्याची आवश्यकता, कोकणचा कॅलिफोर्निया करण्याकरिता कोकण विकास प्रकल्पाचे मार्गदर्शन व उचित कार्यवाहीसाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची आवश्यकता, सर्वसामान्य नागरिकांना उचित माहिती मिळावी यासाठी सार्वजनिक ऑनलाईन डॅशबोर्ड उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री. भास्कर जाधव, आदित्य ठाकरे, सुनिल प्रभु, अजय चौधरी, अनंत (बाळा) नर, महेश सावंत, हारुन खान, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"कोकणात पर्यटन व मत्स्य व्यवसाय विकास प्रकल्पांची घोषणा होऊनही न झालेली पूर्तता, गेल्या ८ ते १० वर्षापासून कोकणात सततची वादळे, चक्रीवादळे, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस इत्यादिमुळे आंबा, काजू इत्यादी फळबागायतदारांचे तसेच मच्छिमार व पर्यटन व्यवसायाचे झालेले नुकसान, शासनाकडून देण्यात येणारी तुटपुंजी मदत, गेल्या १८ वर्षापासून प्रलंबित असलेला मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग, ग्रीन फिल्ड महामार्गाची केवळ घोषणा, चिपळूण-कराड रखडलेला रेल्वे प्रकल्प, रासायनिक कारखान्यांमुळे नद्या, समुद्र व जमीनी प्रदुषित होणे, रोजगार नसल्यामुळे कोकणातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त घरे बंद असणे, मत्स्य दुष्काळ व मच्छीमारांच्या कर्ज माफीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, कोकणातील संपूर्ण किनारपट्टी सिडकोला देण्याचा घातलेला घाट, मुद्दाम वणवे लावून नष्ट होत असलेली वनसंपदा, माकडे व अन्य प्राण्यांपासून शेती व बागायतदारांचे होत असलेले नुकसान, जलजीवन मिशन योजनेचा कोकणात उडालेला बोजवारा, कोकणातील गेल्या २५ वर्षापासून प्रलंबित असलेले सिंचन प्रकल्प, बचत गटातील महिलांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ नसणे, कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, कोकणच्या विकासासाठी अनेक समित्या नियुक्त होणे, सदर समित्यांच्या अहवालातील शिफारशीवर कोणतीही कार्यवाही न होणे, कोकणातील मुलभूत प्रश्नांविषयी शासनाने करावयाच्या उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

**नऊ : शासकीय विधेयके :**

**(अ) पुर:स्थापनार्थ :-**

सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

---------------------------------------------------------------------------------

**(ब) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(१) (क) **सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.संजय मेश्राम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री.अस्लम शेख, विजय वडेट्टीवार, अमीन पटेल, नाना पटोले, विकास ठाकरे, डॉ.ज्योती गायकवाड, डॉ.विश्वजित कदम, सर्वश्री. साजिद पठाण, हेमंत ओगले, रामदास मसराम, अमित झनक, डॉ. नितीन राऊत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन, कायदे (सुधारणा) विधेयक, २०२६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२) सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २८ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६**

---

**(क) विधानपरिषदेने संमत केल्यास विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१) सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ - भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६**

**(२) सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ८ - महाराष्ट्र खाजगी कौशल्य विद्यापीठे (स्थापना व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२६**

**दहा : (सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री विजय वडेट्टीवार, आदित्य ठाकरे, जयंत पाटील, नाना पटोले, भास्कर जाधव, डॉ. जितेंद्र आव्हाड, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री. सुनिल प्रभू, रोहित पवार, अमीन पटेल, दिलीप सोपल, संदिप क्षिरसागर, अस्लम शेख, अजय चौधरी, बापूसाहेब पठारे, अमित देशमुख, डॉ. राहुल पाटील, श्री रोहित पाटील, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री कैलास घाडगे-पाटील, उत्तमराव जानकर, अमित झनक, सुनिल राऊत,**

**नारायण पाटील, विकास ठाकरे, संजय पोतनीस, अभिजीत पाटील, शिरीषकुमार नाईक, नितीन देशमुख, राजू खरे, संजय मेश्राम, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री साजिद खान पठाण, अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, रामदास मसराम, महेश सावंत, अनिल मांगुळकर, प्रविण स्वामी, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागात २०२६ पासून 'मोफत उपचार' सेवा बंद होऊन केसपेपर व शस्त्रक्रियांसाठी शुल्क आकारणी सुरू झाल्याने गरीब रुग्णांचे हाल होत असणे, त्यातच औषधांचा, विशेषतः प्रतिजैविके आणि मनोरुग्णांच्या गोळ्यांचा १.५ वर्षांपासून असलेला तुटवडा चिंतेचा विषय असणे, १,४०० हून अधिक डॉक्टरांची रिक्त पदे आणि भूलतज्ज्ञांच्या अभावामुळे ग्रामीण भागातील गर्भवती महिलांना शेजारील राज्यांत उपचारार्थ जावे लागत असणे, अनेक ग्रामीण रुग्णालयांची गळकी छते, अस्वच्छता आणि फायर एनओसीचा अभाव यामुळे रुग्णांची सुरक्षा धोक्यात आली असणे, राज्यातील औषधी पुरवठ्यामध्ये होत असलेली अनियमितता, प्राथमिक आरोग्यकेंद्र, उपकेंद्र यांची झालेली बिकट परिस्थिती, काही ठराविक औषधांसाठी खरेदी होणे, १०८ वरील रुग्णवाहिका वेळेवर उपलब्ध न होणे, पुण्यातील बी.जे.वैद्यकीय महाविद्यालय (ससून रुग्णालय), नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय आणि मुंबईतील ग्रँट मेडीकल कॉलेज (जे.जे.रुग्णालय) या तीन शासकीय महाविद्यालयांना स्वायत्ततेचा दर्जा देण्याबाबत मा. मुख्यमंत्री यांनी दिनांक ०८ ऑगस्ट, २०२५ रोजी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांना दिलेल्या सूचना, यासंदर्भात वैद्यकीय शिक्षण विभागाने अद्यापपर्यंत समितीची स्थापना न करणे, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये शासनाच्या अखत्यारीत असून विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेणे व पदवी देण्याची जबाबदारी महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ (नाशिक) यांच्याकडे असणे, स्वायतत्ता दिल्यास दोन्ही बाबी एकाच यंत्रणेकडे राहणार असणे, फलटण (जि.सातारा) येथील शासकीय रुग्णालयातील एका महिला डॉक्टरनी माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये हॉटेलमध्ये गळफास घेऊन केलेली आत्महत्या, आत्महत्या करण्यापूर्वी महिला डॉक्टरांनी दोन आरोपींची उघड केलेली नावे, यासंदर्भात एसआयटी आणि न्यायिक चौकशी करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, दोन्ही चौकशी त्वरीत पूर्ण करुन आरोपीस कडक शिक्षा देण्याची आवश्यकता, राज्यात विशेषत: ग्रामीण भागातील महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने करावयाची उपाययोजना,तसेच राज्यातील रस्त्यांची स्थितीही दयनीय असणे, ग्रामीण भागातील रस्त्यांची निधी अभावी झालेली दुरवस्था, शहरी भागात कॉंक्रीटीकरणाच्या कामांमुळे वाहतूक कोंडी वाढली असून घोडबंदर रस्ता अपघातांचा सापळा बनला असणे, निकृष्ट डांबरीकरण, अवजड वाहतूक आणि विविध विभागांमधील समन्वयाअभावी नवीन रस्तेही लवकर खराब होत असणे, यामुळे नागरिकांना

मणक्याचे आजार जडत असून इंधन आणि वाहनांच्या दुरुस्तीवर मोठा खर्च होत असणे, मुंबई - पुणे एक्सप्रेसवेवर ३० तास वाहतूक ठप्प होणे व अन्न-पाण्याविना नागरिकांचे अतोनात हाल होणे, राज्यातील शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिक्षकांची पदे रिक्त असल्याने अध्यापन कार्यावर परिणाम होत असणे, शासनाने कंत्राटी पद्धतीने शिक्षक भरती पुन्हा सुरु करण्याचा निर्णय घेणे, याला शिक्षक संघटना व विविध संघटनांकडून तीव्र विरोध होत असणे, कंत्राटी भरतीमुळे शिक्षकांना नोकरीची हमी, वेतनातील समता व सेवा स्थैर्य मिळत नसणे, त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत नसणे, गुणवत्ता पुर्ण शिक्षण विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी कंत्राटी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्याऐवजी कायमस्वरुपी पद्धतीने शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**अकरा : (सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री अमित साटम, रमेश बोरनारे, चेतन तुपे, योगेश सागर, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, राजकुमार बडोले, प्रविण दटके, दिपक केसरकर, शेखर निकम, अतुल भातखळकर, डॉ. तानाजी सावंत, सर्वश्री प्रतापराव पाटील-चिखलीकर, संभाजी पाटील-निलंगेकर, राजेंद्र गावित, संजय बनसोडे, सुधीर मुनगंटीवार, विजय शिवतारे, राजेश विटेकर, मिहीर कोटेचा, राजेश क्षिरसागर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री. संजय उपाध्याय, डॉ. बालाजी किणीकर, श्रीमती सना मलिक, सर्वश्री मोहन मते, विलास तरे, शंकर मांडेकर, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री चंद्रदीप नरके, प्रकाश सोळंके, प्रकाश सुर्वे, अतुलबाबा भोसले, नरेंद्र भोंडेकर, प्रशांत ठाकूर, मंगेश कुडाळकर, अभिमन्यु पवार, किशोर पाटील, रविंद्र चव्हाण, रविशेठ पाटील, निलेश राणे, संजय केळकर, तुकाराम काते, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री अशोक पाटील, कृष्णा खोपडे, शरददादा सोनावणे, महेश बालदी, बालाजी कल्याणकर, महेश लांडगे, सुहास कांदे, शंकर जगताप, श्रीमती मंजुळा गावित, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री महेंद्र थोरवे, करण देवतळे, महेंद्र दळवी, पराग शाह, चंद्रकांत पाटील, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री संतोष बांगर, बबनराव लोणीकर, विश्वनाथ भोईर, प्रशांत बंब, राम कदम, दिलीप लांडे, कालिदास कोळंबकर, महेश शिंदे, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री आमश्या पाडवी, अनुपभैय्या अग्रवाल, हिकमत उढाण, विक्रम पाचपुते, बाबुराव कदम-कोहळीकर, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री अमोल खताळ, सुरेश भोळे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अमोल जावळे, आनंद तिडके, राहूल कुल, मुरजी पटेल, देवेंद्र कोठे, अमोल पाटील, सत्यजित**

**देशमुख, सुहास बाबर, समीर कुणावार, राजेश मोरे, देवराव भोंगळे, विठ्ठल लंघे, डॉ. राहूल आहेर, सर्वश्री किरण सामंत, नारायण कुचे, शिवाजी पाटील, प्रताप अडसड, मंगेश चव्हाण, डॉ. अशोकराव माने, डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री सुनिल कांबळे, अमल महाडिक, सचिन कल्याण-शेट्टी, प्रकाश भारसाकळे, चरणसिंग ठाकूर, बंटी भांगडिया, राजेश पवार, श्रीमती अनुराधा चव्हाण, श्री. विनोद अग्रवाल, श्रीमती मोनिका राजळे, सर्वश्री किसन कथोरे, राजन नाईक, सर्वश्रीमती विद्या ठाकूर, श्वेता महाले, श्री. सुरेश धस, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री राघवेंद्र पाटील, सुभाष देशमुख, समाधान आवताडे, मनोज घोरपडे, चैनसुख संचेती, डॉ. संजय कुटे, सर्वश्री राजु तोडसाम, प्रविण तायडे, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री राजेश बकाने, तानाजी मुटकुळे, जितेश अंतापुरकर, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री.नरेंद्र मेहता, सर्वश्रीमती स्नेहा दुबे, सुलभा गायकवाड, सर्वश्री हरिश्चंद्र भोये, राजेश पाडवी, दिलीप बोरसे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"दावोसमध्ये आयोजित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वात ३० लाख कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचे झालेले करार व दिवंगत उपमुख्यमंत्री तथा तत्कालीन अर्थमंत्री यांचे आर्थिक नियोजन व योगदान, मा.उपमुख्यमंत्री तथा नगरविकास व गृहनिर्माण मंत्री यांची दूरदृष्टी यामुळे महाराष्ट्र 'गुंतवणूकीचे पावर हाऊस' झाले असणे, यापैकी ८३ टक्के करारामध्ये १८ देशांमधून थेट परकीय गुंतवणूक राज्यात येणार असणे, टाटांसोबत देशातील पहिली इनोव्हेशन सिटी मुंबईजवळ तयार करण्याचे प्रयोजन असणे, मुंबईत सर्क्युलर इकॉनॉमी तयार करण्याचे प्रस्तावित असून त्यामुळे मुंबईतील पाणी, हवा यांचे प्रश्न सोडविणे शक्य होणार असणे, रायगड-पेण ग्रोथ सेंटरची घोषणा दावोसमध्ये करण्यात आली असल्याने यात रुपये १ लाख कोटींची गुंतवणूक अपेक्षित असणे, राज्यातील एकूण गुंतवणूकीमधून ४० लाख रोजगार निर्मितीचे उद्दीष्ट साध्य होणार असणे, छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्राचे दुसरे ऑटोमोबाईल हब होणार असणे, ग्रीन हायड्रोजन क्षेत्रात राज्याने तब्बल ५ लाख कोटींचे करार केले असणे, कृत्रिम बुध्दीमत्तेच्या क्षेत्रात जागतिक महासत्ता असलेल्या एनव्हीडियाशी झालेली चर्चा महाराष्ट्राला डिजिटल कॅपिटल बनविण्याचे पाऊल असणे, गडचिरोली ते नागपूर पर्यंतचा पट्टा पोलाद आणि अक्षय ऊर्जेचे हब बनणार असणे, कोकणात पर्यटनासोबतच 'लॉजिस्टिक हब' म्हणून कोकणची नवीन ओळख होणार असणे, राज्यात होणाऱ्या हवामान बदलास कोळसा, पेट्रोल, डिझेल अशा जीवाश्म इंधनापासूनची ऊर्जा निर्मिती कारण असणे, सर्व जिल्हयांसाठी आणि शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्यात येत असणे, त्याकरिता वातावरणीय कृती कक्ष स्थापन करण्यात आले असणे, राज्य प्रदूषणमुक्त करण्याकरिता विद्युत वाहन धोरण जाहिर करुन विद्युत वाहनधारकांना टोलमुक्त करुन विद्युत गाड्यांच्या वापरासाठी प्रवृत्त करण्यात आले असणे, मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठीत

करण्यात आला असणे, 'माझी वसुंधरा अभियान' राबविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय विभागाकडून देवराई फाऊंडेशन, पुणे या संस्थेसोबत सामंजस्य करार करण्यात येणे, या कराराद्वारे प्रत्येक तालुक्यामध्ये किमान १ मानवनिर्मित देवराई व घनवन तयार करण्यात येणे, औद्योगिक क्षेत्रात परकिय गुंतवणूक व कृत्रिम बुध्दीमतेच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्याचा होत असलेला प्रयत्न आणि पर्यावरणपूरक वातावरण निर्मिती करण्याकडे होत असलेली वाटचाल अधिक गतीमान करण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**बारा : (सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**सर्वश्री जयंत पाटील, आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, डॉ. जितेंद्र आव्हाड, सर्वश्री भास्कर जाधव, नाना पटोले, रोहित पवार, सुनिल प्रभू, डॉ. नितिन राऊत, सर्वश्री संदिप क्षीरसागर, दिलीप सोपल, अमिन पटेल, बापूसाहेब पठारे, अजय चौधरी, संजय मेश्राम, रोहित पाटील, डॉ. राहूल पाटील, सर्वश्री अस्लम शेख, उत्तमराव जानकर, कैलास घाडगे-पाटील, अमित देशमुख, नारायण पाटील, सुनिल राऊत, डॉ. विश्वजीत कदम, सर्वश्री अभिजीत पाटील, संजय पोतनीस, अमित झनक, राजू खरे, नितीन देशमुख, विकास ठाकरे, वरुण सरदेसाई, शिरीषकुमार नाईक, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, साजिद खान पठाण, हारुन खान, हेमंत ओगले, महेश सावंत, रामदास मसराम, प्रविण स्वामी, अनिल मांगुळकर, मनोज जामसुतकर, गजानन लवटे, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"दिनांक २८ जानेवारी, २०२६ रोजी M/S VSR Ventures Pvt. Ltd. संचालित खाजगी विमानाच्या अपघातात राज्याचे तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा झालेला दुर्देवी मृत्यू, या संपूर्ण अपघाताची सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, पिंपरी चिंचवड येथे बलात्कार, खून, चोरी, दरोडा इत्यादी १२३ गुन्ह्यांची नोंद झालेली असणे, राज्यात लहान बालकांच्या अपहरणात भयंकर वाढ झालेली असून त्यामुळे पालकांत पसरलेले भितीचे वातावरण, लहान बालिकांवर करण्यात येत असलेले बलात्कार, बदलापूर येथे पुन्हा चार वर्षीय बालिकेवर बलात्कार केल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, “स्पा” च्या नावाखाली राज्यात ठिकठिकाणी सुरु असलेला देह विक्रिचा व्यवसाय, राज्यात ऑनलाईन जुगार मोठ्या प्रमाणात सुरु असून शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागात सुद्धा या जुगाराचे लोण पसरलेले असणे, ड्रग्स व अंमली पदार्थांच्या विक्रीवर तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गारगाव येथील एका वीस वर्षीय तरुणीची तीन लाख रुपयांना विक्री केल्याची घटना नुकतीच उघडकीस येणे, राज्यातील महिलांवर वाढत्या अत्याचाराच्या घटनांमुळे महिलावर्गात पसरलेले भितीचे

वातावरण, यांना आळा घालणाऱ्या व महिलांना कायदेशीर संरक्षण देणाऱ्या शक्ती कायद्याची अद्यापही अंमलबजावणी करण्यात न येणे, एकंदरीतच राज्यातील कायदा सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा, पोलिस प्रशासनावरील शासनाचे सुटलेले नियंत्रण, महावितरण कंपनीच्या राज्यातील जालना, छत्रपती संभाजी नगर, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, सोलापूर, धाराशिव इत्यादी जिल्ह्यातील मंडळ कार्यालये खाजगी कंपन्यांना देण्याचा निर्णय दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजी घेण्यात येणे, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिकल वर्कर्स फेडरेशनने सदर निर्णयास केलेला तीव्र विरोध, नागपूर, जळगाव व छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील खाजगी विद्युत कंपन्यांनी कराराच्या मुदतीआधीच कामे सोडून देणे, ओरिसा व उत्तर प्रदेशमध्येही खाजगी विद्युत कंपन्यांनी वीज वितरणामधून माघार घेणे, असे असतांनाही राज्यात विद्युत कंपनीच्या खाजगीकरणाचा आग्रह असणे, पश्चिम महाराष्ट्रात ३११ कोटी रुपयांची विद्युतमंडळाची थकबाकी असणे, “मागेल त्याला कृषी सौरपंप” योजनेच्या लाभासाठी निवड झाल्यानंतर पैसे भरुनही सौरपंप मिळत नसल्याने राज्यातील सुमारे अडीच लाख शेतकरी त्रस्त असणे, मुंबई शहराच्या पूर्व व पश्चिम उपनगरांमध्ये ६० ते ७० वर्षापूर्वीच्या अनेक जुन्या व जीर्ण झालेल्या अनेक चाळी/इमारती असणे, मुंबई शहराप्रमाणे उपनगरांसाठी इमारत व घर दुरुस्ती मंडळ नसणे, त्या इमारती केव्हाही कोसळण्याच्या स्थितीत असणे, या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे जीवन धोक्यात आलेले असणे, एसआरए योजनांमध्ये अशा जुन्या चाळीतील वरच्या मजल्यावरील रहिवाश्यांना सामावून घेण्यात येत नसणे, ज्यामुळे पुर्नविकासामध्ये येणाऱ्या प्रचंड अडचणी, राज्यातील विविध शासकीय विभागांमध्ये वाढत चाललेल्या भ्रष्टाचाराच्या घटनांमुळे प्रशासनावरील जनतेचा विश्वास ढासळत असणे, महसूल, बांधकाम, आरोग्य, शिक्षण, नगरविकास, सामाजिक न्याय, जलसंधारण तसेच इतर अनेक विभागांमध्ये कामे मंजूर करण्यासाठी, परवाने देण्यासाठी, कंत्राटे देण्यासाठी तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत असणे, अनेक प्रकरणांमध्ये भ्रष्टाचार उघडकीस येऊनही दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई होत नसल्याने अशा प्रकारांना प्रोत्साहन मिळत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण होणे, शासनाच्या औषध खरेदीत होत असलेली अनियमितता आणि भ्रष्टाचार, तसेच महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात होत असलेला भ्रष्टाचार, परिणामी सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामांसाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून शासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असणे, राज्यातील विविध विभागांमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचाराच्या घटनांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत तसेच प्रशासनात पारदर्शकता व जबाबदारी निश्चित करण्याची आवश्यकता, याबाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

तेरा : (सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सर्वश्री अतुल भातखळकर, रमेश बोरनारे, अनिल पाटील, रणधीर सावरकर, अब्दुल सत्तार, मनोज कायंदे, संजय केळकर, अर्जुन खोतकर, श्रीमती सुलभा खोडके, सर्वश्री योगेश सागर, दिपक केसरकर, राजकुमार बडोले, सुधीर मुनगंटीवार, डॉ. तानाजी सावंत, सर्वश्री प्रतापराव पाटील-चिखलीकर, रविंद्र चव्हाण, राजेंद्र गावित, चंद्रकांत नवघरे, डॉ. संजय कुटे, सर्वश्री विजय शिवतारे, राजेश विटेकर, प्रविण दटके, राजेश क्षिरसागर, नितीन पवार, अमित साटम, प्रदिप जैस्वाल, श्रीमती सरोज अहिरे, श्री बबनराव  लोणीकर, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्री शंकर मांडेकर, सुमित वानखेडे, विलास तरे, सुनिल शेळके, संजय उपाध्याय, चंद्रदीप नरके, चेतन तुपे, सुरेश धस, नरेंद्र भोंडेकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री प्रशांत ठाकूर, मंगेश कुडाळकर, सचिन पाटील, सत्यजित देशमुख, किशोर पाटील, शेखर निकम, विजय देशमुख, शांताराम मोरे, संजय बनसोडे, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री प्रकाश सुर्वे, प्रकाश सोळंके, श्रीमती सीमा हिरे, सर्वश्री निलेश राणे, हरिष पिंपळे, अशोक पाटील, सुरेश भोळे, शरददादा सोनावणे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री बालाजी कल्याणकर, सुहास कांदे, दिलीप बोरसे, संजय गायकवाड, सर्वश्रीमती मोनिका राजळे, मंजुळा गावित, सर्वश्री राजेश पाडवी, महेंद्र थोरवे, विक्रम पाचपुते, महेंद्र दळवी, अनुपभैय्या अग्रवाल, चंद्रकांत पाटील, मंगेश चव्हाण, संतोष बांगर, गोपिचंद पडळकर, दिलीप लांडे, ॲड. राहुल ढिकले, श्री. महेश शिंदे, डॉ. सुरेश  खाडे, सर्वश्री आमश्या पाडवी, सुभाष देशमुख, हिकमत उढाण, भिमराव तापकीर, बाबुराव कदम-कोहळीकर, सुनिल कांबळे, अमोल खताळ, सिध्दार्थ शिरोळे, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री अतुल भोसले, आनंद तिडके, शंकर जगताप, मुरजी पटेल, राहूल कुल, अमोल पाटील, समाधान आवताडे, देवेंद्र कोठे, सुहास बाबर, प्रशांत बंब, विलास भुमरे, संभाजी पाटील-निलंगेकर, राजेश मोरे, नारायण कुचे, विठ्ठल लंघे, संतोष दानवे, किरण सामंत, प्रकाश भारसाकळे, सचिन कल्याण-शेट्टी, अशोकराव माने, चैनसुख संचेती, श्रीमती श्वेता महाले, सर्वश्री प्रताप अडसड, शिवाजी पाटील, श्याम खोडे, मोहन मते, राजु तोडसाम, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री समीर कुणावार, मिहीर कोटेचा, राजेश बकाने, चरणसिंग ठाकूर, देवराव भोंगळे, किशोर जोरगेवार, रत्नाकर गुट्टे, विनोद अग्रवाल, करण देवतळे, डॉ. मिलिंद नरोटे, श्री. राजेश पवार, ॲड. श्रीजया चव्हाण, श्रीमती नमिता मुंदडा, श्री. जितेश अंतापुरकर, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. राजन नाईक, श्रीमती स्नेहा दुबे, श्री. राम कदम, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, सर्वश्री काशिराम पावरा, भीमराव केराम, राघवेंद्र पाटील, अमोल जावळे, सुधीर गाडगीळ, राहुल आवाडे, हेमंत रासने, प्रविण तायडे, किसन वानखेडे, उमेश यावलकर, राजेश वानखडे, केवलराम काळे, कृष्णा खोपडे, समीर मेघे, बंटी भांगडिया, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री विजय रहांगडाले, संजय पुराम, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री तानाजी मुटकुळे, रमेश कराड, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री नरेंद्र मेहता, महेश बालदी, श्रीमती सुलभा गायकवाड, श्री. हरिश्चंद्र भोये, श्रीमती विद्या ठाकूर, सर्वश्री रवी राणा, अमल महाडिक, मनोज घोरपडे,

**कुमार आयलानी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :- (मंत्र्यांचे उत्तर)**

"महाराष्ट्राला निसर्गरम्य समुद्रकिनारा, प्राचीन लेण्या, गडकिल्ले, घनदाट वनसंपदा असा समृध्द वारसा लाभला असणे, पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणूकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकुल वातावरण निर्माण करण्याकरिता 'पर्यटन धोरण-२०२४' जाहिर करण्यात आले असणे, येत्या १० वर्षांत पर्यटन क्षेत्रात १ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असणे, सिंधुदुर्ग जिल्हयातील सागरी संग्रहालय, कृत्रिम प्रवाळ आणि पाणबुडी पर्यटन ही ७५ कोटी रुपये किंमतीची कामे प्रगतीपथावर असणे,मराठा मिलिटरी लँडस्केप संकल्पनेअंतर्गत राज्यातील १२ ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा समावेश युनोस्कोच्या जागतिक वारसा नामांकन यादीत झाल्यामुळे राज्यातील गडकिल्ल्यांना जागतिक गौरवाचे कोंदण प्राप्त झाले असणे, जागतिक पर्यटक युनोस्को नामांकित गडकिल्ल्यांना भेटी देण्याचे प्रमाण वाढले असणे, किल्ले पर्यटनाला चालना देण्याकरिता राज्यातील ७५ ठिकाणी आधुनिक सोयी-सुविधांयुक्त पर्यटन माहिती व सुविधा केंद्रे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला असणे, नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक दस्तावेज असलेली तलवार राज्य शासनाने एका मध्यस्थामार्फत जवळपास ४७.१५ लाख रुपयांमध्ये लंडनमधून खरेदी करुन राज्यात आणली असणे, १०० वर्षांहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' म्हणून घोषित करण्यात आले असणे, पर्यटन व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या राज्यातील महिलांकरिता 'आई पर्यटन कर्ज योजना' सुरु करण्यात आली असणे, पर्यटन स्थळांवर पर्यटकांना सुरक्षित वातावरण देण्याकरिता 'महाराष्ट्र पर्यटन सुरक्षा बल' योजना सुरु करण्यात आली असणे, राज्यातील पर्यटन स्थळांना भेटी देण्याकरिता कमी शुल्कात राज्यात एसटीने प्रवास करण्याकरिता 'एसटी पर्यटन पास योजना' कार्यान्वित असणे, महिला पर्यटकांसाठी एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणे, राज्यातील अष्टविनायक गणपती मंदिरे, श्री क्षेत्र तुळजा भवानी मंदिर, श्री ज्योतिबा मंदिर, त्र्यंबकेश्वर मंदिर, कोल्हापूरातील महालक्ष्मी मंदिर, श्री क्षेत्र भीमा शंकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक इत्यादींच्या विकास आराखडयास ३६६१ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असणे, अकोला शहरातील राजराजेश्वर मंदिराच्या विकासाकरिता ५० कोटी रुपयांची तरतूद उच्चस्तरीय समितीकडे मान्यतेसाठी पडून असणे, पुण्यातील सिंहगड किल्ला व परिसर विकासाकरिता रु.२८५.९९ कोटी इतक्या रक्कमेच्या आराखडयास उच्चाधिकार समितीमध्ये मान्यता दिली असणे व निधीचा प्रस्ताव शिखर समितीमध्ये मान्यतेसाठी येण्याची आवश्यकता, राज्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या सन २०४७ पर्यंत वार्षिक १६ कोटींवरुन ३८ कोटींपर्यंत वाढविण्याचे उद्दीष्ट असणे, याकरिता मुंबई, सिंगापूर आणि दुबई मध्ये पर्यटन गुंतवणूक कक्ष सुरु करण्यात येणे, प्रधानमंत्री कुसुम घटक 'ब' योजनेंतर्गत मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेखाली डिसेंबर, २०२५ या एका महिन्यांमध्ये ४५,९११ सौर कृषी पंप बसवून महाराष्ट्राची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली असणे, राज्याची पुढील १० वर्षांची स्वच्छ व पर्यावरणपूरक ऊर्जेची गरज विचारात घेता 'महाराष्ट्र नवीकरणीय ऊर्जा आणि ऊर्जा साठवूणक योजना धोरण २०२५ ते २०३५' जाहिर करण्यात आले असणे, त्याअंतर्गत सन २०२९ पर्यंत ५० टक्के व सन २०३५ पर्यंत ६५ टक्के हरित ऊर्जा प्राप्त

करण्याचे उद्दीष्ट असणे, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना- २.० अंतर्गत एकूण १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा क्षमता स्थापित करण्याचे उद्दीष्ट ठरविण्यात आले असणे, 'शेतीला दिवसा वीज पुरवठा अभियान, २०२५ मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' अंतर्गत ग्रामीण क्षेत्रातील ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यात येणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्रयरेषेखालील वीज ग्राहकांसाठी 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप सोलर योजना' सुरु करण्यात आली असणे, राज्यातील ७.५ अश्वशक्तीपर्यंत क्षमता असलेल्या कृषी पंपाचा वापर करणाऱ्या शेतकऱ्यांना मोफत वीजपुरवठा करण्याकरिता 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' कार्यान्वित करण्यात आली असणे, पर्यटनदृष्टया राज्य समृध्द होण्यासाठी व त्यातून आर्थिक स्त्रोत निर्माण होण्यासाठी तसेच ऊर्जेच्या क्षेत्रात राज्य स्वयंपूर्ण होऊन शेतकरी चिंतामुक्त होण्यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना."

**चौदा : सर्वश्री प्रशांत बंब, रमेश बोरनारे, अनिल पाटील, सुधीर मुनगंटीवार, अब्दुल सत्तार, मनोज कायंदे, रणधीर सावरकर, अर्जुन खोतकर, श्रीमती सुलभा खोडके, डॉ. संजय कुटे, सर्वश्री दिपक केसरकर, प्रताप पाटील-चिखलीकर, योगेश सागर, डॉ. तानाजी सावंत, सर्वश्री राजकुमार बडोले, प्रविण दटके, राजेंद्र गावित, रविंद्र चव्हाण, विजय शिवतारे, चंद्रकांत नवघरे, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री राजेश क्षिरसागर, राजेश विटेकर, अमित साटम, प्रदिप जैस्वाल, नितीन पवार, बबनराव लोणीकर, डॉ. बालाजी किणीकर, सर्वश्रीमती सरोज अहिरे, श्वेता महाले, सर्वश्री विलास तरे, शंकर मांडेकर, संजय केळकर, चंद्रदीप नरके, सुनिल शेळके, सुभाष देशमुख, नरेंद्र भोंडेकर, चेतन तुपे, श्रीमती मनिषा चौधरी, श्री. मंगेश कुडाळकर, डॉ. किरण लहामटे, सर्वश्री सत्यजित देशमुख, किशोर पाटील, सचिन पाटील, संजय उपाध्याय, शांताराम मोरे, शेखर निकम, मंगेश चव्हाण, प्रकाश सुर्वे, संजय बनसोडे, महेश लांडगे, निलेश राणे, प्रकाश सोळंके, डॉ. अतुल भोसले, सर्वश्री तुकाराम काते, राजू कारेमोरे, प्रताप अडसड, अशोक पाटील, दिलीपराव बनकर, मोहन मते, चंद्रकांत सोनवणे, श्रीमती सना मलिक, सर्वश्री कृष्णा खोपडे, बालाजी कल्याणकर, अभिमन्यु पवार, सुहास कांदे, सुमित वानखेडे, संजय गायकवाड, शिवाजी पाटील, श्रीमती मंजुळा गावित, सर्वश्री देवराव भोंगळे, महेंद्र थोरवे, महेंद्र दळवी, सुरेश धस, चंद्रकांत पाटील, नारायण कुचे, संतोष बांगर, राजेश पवार, विश्वनाथ भोईर, संतोष दानवे, दिलीप लांडे, श्रीमती सीमा हिरे, श्री. महेश शिंदे, ॲड. श्रीजया चव्हाण, सर्वश्री आमश्या पाडवी, हिकमत उढाण, संजय केळकर, बाबुराव कदम-कोहळीकर, नरेंद्र मेहता, अमोल खताळ, राजन नाईक, श्रीमती रंजना जाधव, सर्वश्री कालिदास कोळंबकर, आनंद तिडके, श्रीमती मोनिका राजळे, श्री. मुरजी पटेल, डॉ. राहूल आहेर, सर्वश्री अमोल पाटील, विक्रम पाचपुते, सुहास बाबर, हरिष पिंपळे, विलास भुमरे, विजय देशमुख, राजेश मोरे, सुनिल कांबळे, विठ्ठल लंघे, चैनसुख संचेती, किरण सामंत, प्रविण तायडे, डॉ. अशोकराव माने, सर्वश्री पराग शाह, राजेंद्र यड्रावकर-पाटील, शरद सोनवणे, कॅप्टन आर. तमिल सेल्वन, श्री. समीर कुणावार, डॉ. आशिष देशमुख, सर्वश्री किशोर जोरगेवार, चरणसिंग ठाकूर, राजेश बकाने, डॉ. विजयकुमार गावित, सर्वश्री सुरेश भोळे, राजेश पाडवी, दिलीप बोरसे, राघवेंद्र पाटील, ॲड. राहुल ढिकले, सर्वश्री अनुपभैय्या अग्रवाल, अमोल जावळे,**

**डॉ. सुरेश खाडे, सर्वश्री राहूल कुल, सिध्दार्थ शिरोळे, भिमराव तापकीर, सचिन कल्याण-शेट्टी, समाधान आवताडे, शंकर जगताप, देवेंद्र कोठे, प्रकाश भारसाकळे, श्याम खोडे, राजु तोडसाम, राजेश वानखडे, विजय रहांगडाले, बंटी भांगडिया, डॉ. मिलिंद नरोटे, सर्वश्री करण देवतळे, संजय पुराम, राणाजगजितसिंह पाटील, संभाजी पाटील-निलंगेकर, डॉ. तुषार राठोड, सर्वश्री भीमराव केराम, जितेश अंतापुरकर, श्रीमती अनुराधा चव्हाण, सर्वश्री रमेश कराड, किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, महेश चौघुले, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री कुमार आयलानी, हरिश्चंद्र भोये, सर्वश्रीमती स्नेहा दुबे, सुलभा गायकवाड, श्री. राम कदम, श्रीमती विद्या ठाकूर, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री रवी राणा, रत्नाकर गुट्टे, हेमंत रासने, मनोज घोरपडे, राहुल आवाडे, सुधीर गाडगीळ, श्रीमती सई डहाके, सर्वश्री केवलराम काळे, तानाजी मुटकुळे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यातील जनता निरोगी रहावी व तिचे आरोग्य सुदृढ रहावे यासाठी प्रत्येक नागरिकाला 'आरोग्यम सुखसंपदा' उपलब्ध व्हावी याकरिता राज्य शासनाने "आयुष्यमान भारत योजना", "महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना", "राजीव गांधी जीवनदायी योजना" इत्यादी योजनांच्या माध्यमातून राज्यातील जनतेला जलद, पारदर्शक व रुग्णस्नेही उपचार मिळण्यासाठी प्रयत्न केले असणे, राज्यात टीएमएस-२.० प्रणालीन्वये रुग्ण नोंदणीपासून उपचार पूर्ण होईपर्यंतची संपूर्ण प्रक्रिया डिजिटल, पारदर्शक व ऑनलाईन करण्यात आली असणे, या योजनेंतर्गत रुग्ण नोंदणी ऑनलाईन बायोमॅट्रीक प्रणालीद्वारे करण्यात येणे, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत विमा संरक्षण दीड लाखांहून पाच लाखांपर्यंत करण्यात येणे, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेंतर्गत लाखो रुग्णांवर मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणे, शून्य ते अठरा वर्षांपर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुलां-मुलींच्या सर्वांगीण आरोग्य तपासणीसाठी 'जागृत पालक, सुदृढ बालक' अभियान राज्यभर राबविण्यात येणे, हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना या योजनेंतर्गत राज्यात शहरी व ग्रामीण भागात ७०० दवाखाने सुरु असणे, शासकीय, निमशासकीय आरोग्य संस्थांसाठी औषधे, वैद्यकीय उपकरणे इ. खरेदीमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी "महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण" स्थापन करण्यात येणे, मुंबईतील खाजगी रुग्णालयांमध्ये मध्यम व दुर्बल घटकातील रुग्णांसाठी १० टक्के खाटा राखीव ठेवणे अनिवार्य करण्यात येणे, मुंबईत मेट्रोच्या अनेक नवीन लाईन्स सुरु करुन ट्राफिक कमी करण्याचा व प्रवास जलद करण्याचा प्रयत्न करण्यात येणे, १२ डब्यांच्या लोकल ऐवजी १५ डब्यांच्या लोकल सुरु करण्याचे प्रस्तावित असल्याने प्रवाश्यांची क्षमता २० टक्के वाढणार असणे, मुंबईतील ट्राफिकला पर्याय म्हणून मुंबईत ३४० कि.मी. लांबीचे जलवाहतूक नेटवर्क तयार करण्याची योजना असणे, मुंबईत ट्रान्सहार्बर लिंक व कोस्टल रोड केल्याने मुंबई-नवी मुंबई प्रवाश्यांच्या प्रवासाचा वेळ कमी होणे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे प्रवास आणि अर्थव्यवस्थेला चालना मिळणे, पालघर जिल्हयात औद्योगिक

टाऊनशिपच्या माध्यमातून चौथी मुंबई संकल्पना राबविण्याचे प्रस्तावित असणे जेणेकरुन मुंबईतील लोकसंख्येला रोजगाराचे नवीन पर्याय उपलब्ध होऊन मुंबईवरील लोकसंख्येचा ताण नियंत्रित होऊ शकेल, पर्यावरणपूरक विकास योजनेच्या माध्यमातून २०५० पर्यंत कार्बन कमी करण्याचे नियोजन असणे, २०२५-२०३० साठी शहराचा विकास आराखडा तयार करण्यात येणे, या माध्यमातून ट्राफिक कमी करणे, हरितक्षेत्र वाढविणे, कनेक्टीव्हीटी देणे, स्वस्त गृहनिर्माण योजना राबविणे इ. प्रयत्न असणे, राज्यातील आर्थिक दृष्टया दुर्बल घटकाला शासकीय तसेच खाजगी रुग्णालयांमध्ये कॅशलेस आधुनिक उपचार मिळण्याच्या दृष्टीने शासन करीत असलेला प्रयत्न आणि मुंबईकरांना सुखकर प्रवास, खड्डेमुक्त व प्रदूषणमुक्त मुंबई इत्यादीसाठी वाहतुकीचे विविध पर्याय उपलब्ध करण्याकरिता व मुंबईतील लोकसंख्या नियंत्रित करण्याकरिता करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पंधरा : अंतिम आठवडा प्रस्ताव :-**

**सर्वश्री आदित्य ठाकरे, विजय वडेट्टीवार, जयंत पाटील, भास्कर जाधव, नाना पटोले, डॉ. जितेंद्र आव्हाड, श्री सुनिल प्रभू, डॉ. नितीन राऊत, सर्वश्री रोहित पवार, दिलीप सोपल, अमीन पटेल, संदिप क्षिरसागर, अजय चौधरी, अस्लम शेख, बापूसाहेब पठारे, डॉ. राहुल पाटील, सर्वश्री अमित देशमुख, रोहित पाटील, कैलास घाडगे-पाटील, डॉ.विश्वजीत कदम, सर्वश्री उत्तमराव जानकर, सुनिल राऊत, अमित झनक, नारायण पाटील, संजय पोतनीस, शिरीषकुमार नाईक, अभिजीत पाटील, नितीन देशमुख, संजय मेश्राम, राजू खरे, वरुण सरदेसाई, डॉ. ज्योती गायकवाड, सर्वश्री अनंत (बाळा) नर, हेमंत ओगले, हारुन खान, विकास ठाकरे, महेश सावंत, साजिद खान पठाण, मनोज जामसुतकर, रामदास मसराम, गजानन लवटे, अनिल मांगुळकर, सिध्दार्थ खरात, संजय देरकर, बाबाजी काळे, प्रविण स्वामी, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९२ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्य सरकारच्या २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याच्या निर्णयामुळे मुंबईसह राज्यात १००० शाळा बंद पडण्याचा धोका निर्माण होणे, सीबीएसई, आयसीएसई, आयबी बोर्डाच्या शाळा व विद्यार्थ्यांची संख्या वाढत जाणे, गोदावरी, चंद्रभागा, नागनदी व पंचगंगा नद्या प्रदुषण मुक्त करण्याचा शासनाचा कृती आराखडा, वृक्षतोड, वाहतूक कोंडी, बेसुमार बांधकामे यामुळे एमएमआरडीए क्षेत्र, मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर इत्यादी शहरात वाढलेले प्रदुषण, पर्यावरणाचा ऱ्हास, एमआयडीसी विकसित करीत असलेल्या शिळ-महापे (जि.ठाणे) हा वन विभागाचा रस्ता रुंदीकरणासाठी केंद्र शासनाच्या वन विभागाची अंतिम मान्यता न घेणे व वनीकरणासाठी राखीव असलेले क्षेत्र खाजगी विकासकाला परस्पर वितरीत करणे, सदर प्रकरणाची चौकशी करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डातील कंत्राटी कामगारांच्या सेवा नियमित करण्याबाबत, पालघर व ठाणे जिल्हयातील आदिवासींच्या मुलभूत प्रश्नांबाबत प्रशासकीय अनास्था, मराठवाडा, विदर्भ व उर्वरीत महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळांना मार्च, २०२० नंतर मुदतवाढ देण्यात न येणे, राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात महिलांवर वाढलेले अत्याचार, मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्स याचे प्रमाण नवयुवकांमध्ये वाढत असल्याची बाब समोर येणे, राज्यात भोंदुबाबांचे प्रकार वाढले असून त्यामुळे महिला व सर्वसामान्य जनता त्याला बळी

पडत असणे, नाशिक येथील अशोक खरात या भोंदुबाबाने अनेक महिलांचे शोषण केल्याचा प्रकार उघड होणे, राज्यात मोठ्या प्रमाणात पैसे डबल करून देत असल्याचे सांगून फसवणूक केल्याची बाब समोर येणे, राज्यातील सीमावर्ती भागात परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांकडून मनमानी वसुली होत असल्याची बाब निदर्शनास येणे, शासकीय नोकरीचे आमिष दाखऊन तरुण व तरुणींची होत असलेली फसवणूक, राज्यातील विविध विभागात सुरू असलेल्या शासकीय कर्मचारी भरतीमध्ये होत असलेले भ्रष्टाचार, राज्यातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये जमिनीचे होत असलेले गैरव्यवहार, **CAG** ने दिलेले अहवाल, शासकीय जमीनींची होत असलेली लूट, राज्यातील नगर परिषदेमध्ये व नगरपालिका अंतर्गत स्वच्छतेच्या कामांमध्ये होत असलेली अनियमितता, राज्यामध्ये शुद्ध पाण्याच्या नावाखाली प्रत्येक ठिकाणी **RO** प्लांट टाकून स्वच्छ पाण्याची होत असलेली विक्री, राज्यात होत असलेला शालार्थ आयडी भ्रष्टाचार व त्यामुळे शिक्षकांवरती अतिरिक्त कार्यभार वाढत असणे, शालेय शिक्षण विभाग अंतर्गत प्रधानमंत्री पोषण आहारामध्ये होत असलेला भ्रष्टाचार, राज्यातून केजी टू पीजी सर्व शिक्षण व्यवस्था, शाळांची दयनीय परिस्थिती निर्माण होणे व शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार, वाढती फी यामुळे विद्यार्थी पालक बेजार होणे, सामाजिक न्याय विभागाच्या विविध आश्रम शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंमध्ये काही ठराविक विविध निविदा धारकांना सहाय्य करण्यासाठी झालेला भ्रष्टाचार, दिव्यांग विभागामध्ये खोटे प्रमाणपत्र देऊन शासनाच्या घेतलेल्या नोकरीमध्ये फसवणूक झाल्याबाबत, रस्त्यांची झालेली दुरवस्था, ग्रामीण भागामध्ये प्रामुख्याने रस्त्यांची दुरवस्था झालेली असणे, लहान व मोठे पुलांचे बांधकामासाठी निधीची उपलब्धता न होणे, गेल्या दोन वर्षापासून राज्यातील विविध कंत्राटदारांची मोठ्या प्रमाणात देयके शासनाकडे प्रलंबित असणे, त्यामुळे विकास कामे अपुरी असल्याची बाब समोर येणे, सार्वजनिक बांधकामांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार, अन्न नागरी पुरवठा विभागात, प्रामुख्याने सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील निविदा प्रक्रियेमध्ये झालेला घोळ तसेच **POS** मशीनच्या निविदा प्रक्रियेत झालेले भ्रष्टाचार, महसूल विभागामध्ये मोठ्या प्रमाणात टीडीआर घोटाळा समोर येणे, जलसंधारण विभागातील घोटाळा, वैद्यकीय उपकरणे/ औषधे खरेदी गैरव्यवहार, अन्न व औषध प्रशासन विभागातील गैरव्यवहार, राज्यात विविध भूसंपादन प्रकरणात होत असलेला घोटाळा, विरार अलिबाग कॉरिडॉर कामाच्या भूसंपादनामध्ये कुंडेवहाळ, ता.पनवेल येथील जमिनीसंदर्भात झालेला ५६ कोटीचा घोटाळा, यावर न्यायालयाने आदेश देऊन देखील संबंधित अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई न करता पाठराखण करण्याची शासनाची भूमिका, आदिवासी, विविध इनाम जमिनी हडपण्याचे राज्यात वाढलेले प्रमाण, एकंदरीतच महसूल विभागात वाढलेला भ्रष्टाचार व त्यावर नियंत्रण आणण्यास शासनाला आलेले अपयश, ठाणे महानगरपालिका क्षेत्रात तीव्र पाणी टंचाई जाणवत असतानाही मा.उच्च न्यायालयाकडे मुबलक पाणी असल्याचे खोटे प्रतिज्ञापत्र महापालिकेने सादर करणे, महापालिकेच्या शहरविकास विभागामध्ये मोठ्या प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, रतनशी प्रेमजी ट्रस्टने ठाणे येथील जमिनीच्या विक्रीमध्ये केलेला गैरव्यवहार, येऊर येथील आदिवासी जमीनी धनदांडग्यांनी बळकावणे, आदिवासींवर होणारा अन्याय, अत्याचार, ठाणे येथील वनजमिनीवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झालेली असणे, शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सोळा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ४)**

**(१) श्री. रईस शेख, वि.स.स.**

"अल्पसंख्याक संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे कामकाज सुरु करण्याबाबत" या विषयावरील श्री.रईस शेख व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २५३१० ला दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(२) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यातील वीज दरवाढीमुळे उद्योग राज्याबाहेर स्थलांतरीत होत असल्याबाबत" या विषयावरील श्री. धनंजय मुंडे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १५६६२ ला दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील."

**(३) श्री.अस्लम शेख, वि.स.स.**

"मुंबईसह कोकणातील सागरीक्षेत्रात बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या टॉलर्सवरील दंडाची रक्कम वाढविण्याबाबत" या विषयावरील श्री.अस्लम शेख व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २३२५४ ला दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील "

**(४) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

"राज्यातील नद्यांमधील वाढते प्रदूषण रोखण्याबाबत" या विषयावरील डॉ.नितीन राऊत व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २२९७७ ला दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा तास चर्चा उपस्थित करतील "

**(सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६ रोजी बॅलेटद्वारे काढण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ५ व ६)**

**(५) श्री.संजय केळकर, वि.स.स.**

"राज्यातील कामगार रुग्णालयात आरोग्य विषयक सोयी-सुविधा उपलब्ध करणेसह नवीन कामगार रुग्णालये उभारणेबाबत" या विषयावरील श्री.अमित देशमुख व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १६८११ ला दिनांक १२ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा तास चर्चा उपस्थित करतील."

**(६) श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.**

"राज्यातील जल जीवन मिशन योजनेची कामे अपूर्ण असल्याबाबत" या विषयावरील डॉ. नितिन राऊत व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक २३१४० ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा तास चर्चा उपस्थित करतील."

**(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या परंतु पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ७ ते २१)**

**(७) श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मानवी स्वास्थ्याच्या समस्या दिवसेंदिवस वाढत असणे, अश्या स्थितीत समाजाला स्वास्थपूर्ण व समृध्द बनविण्यासाठी योगसाधनेशिवाय पर्याय नसणे, वैश्विक स्तरावर देखील उत्तम शारिरीक स्वास्थ्याचा पर्याय म्हणून योगास मान्यता मिळणे, योगसाधनेबाबत जनजागृती करून समाजाला सुदृढ ठेवण्यासाठी योगशिक्षक स्वयंप्रेरणेने व निस्वार्थ वृत्तीने निरंतर कार्य करीत असणे, गुजरात, हरीयाणा, राजस्थान या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र योग शिक्षक संघ या संघटनेने महाराष्ट्रात योग आयोग स्थापन करावा या प्रमुख मागणीसह इतर काही महत्वपूर्ण मागण्या शासनाकडे केलेल्या असणे, सदर मागण्यांची तातडीने पूर्तता होण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(८) डॉ. नितीन राऊत, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"विदर्भातील अनेक तालुक्यात अनेक दुर्गम आदिवासी पाडे येत असल्यामुळे तेथे पावसाळयात जाणे शक्य होत नसणे, या दुर्गम आदिवासी पाडयांमध्ये अनेक विद्यार्थी प्रतिकूल नैसर्गिक परिस्थितीमुळे शिक्षणापासून वंचित रहात असणे, पावसाळयात येथील नदी-नाल्यांना पूर येत असल्यामुळे या विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे यासाठी शासनाने काही निवासी शाळा सुरु करणे, येथे विद्यार्थी उत्तम शिक्षण घेत असले तरी त्यांचे बालपण हिरावून घेतले जात असणे, विद्यार्थ्यांना कुटुंबापासून दूर रहावे लागत असणे, याउलट जिल्हा परिषद शाळांतील विद्यार्थी दुपारी घरी गेल्यानंतर आई-वडील व कुटुंबियांसोबत वेळ घालवत असल्याने त्यांची आकलन क्षमता निवासी शाळांतील विद्यार्थ्यांपेक्षा अधिक असणे, त्यामुळे दुर्गम भागातील आदिवासी पाडे व गावांमधील विद्यार्थ्यांना घराजवळच दर्जेदार शिक्षण घेता यावे, त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणता यावे, यासाठी अशा भागातील जिल्हा परिषद शाळा टिकवून ठेवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(९) श्री. अस्लम शेख, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबईच्या पश्चिम उपनगरातील मालाड (प) मालवणी, दादासाहेब गायकवाड नगर येथे म्हाडाचे २५०० बैठे निवासी गाळे असणे, शासनाने दि. १८/०५/१९८७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बैठे निवासी गाळे विक्री योजना लागू करण्यात येणे, त्यानुसार सन १९९३ मध्ये गाळेधारकांच्या संमती पत्रकानुसार परवानगी देण्यात येणे, परंतू सदर योजनेस अत्यल्प प्रतिसाद मिळणे, २५०० बैठे निवासी

गाळेधारकांपैकी १४२९ निवासी गाळयांना विक्री योजनेअंतर्गत सहभागी करण्यात येणे, उर्वरित १०७१ बैठे निवासी गाळेधारक अपरिहार्य कारणामुळे योजनेत सहभागी सहभागी न होणे, बैठे निवासी गाळेधारक अत्यल्प उत्पनधारक असल्याने सदरच्या विक्री योजनेत सहभागी होता आलेले नसणे, शासनाने १०७१ बैठे निवासी गाळे धारकांसाठी नवीन विक्री योजना जाहिर करुन निवासी गाळे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१०) श्री. विनोद निकोले, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोंडी अद्यापही सुटलेली नसणे, सुमारे ५५४ कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च करुन बांधलेल्या महामार्गाचे काम निकृष्ट दर्जाचे होणे, मुंबईकडील मार्गिकेचे काम अद्यापही धिम्या गतीने सुरू असल्याने नव्याने तयार केलेल्या रस्त्यावरही मोठ्या प्रमाणात खड्डे होणे, अनेक ठिकाणी कॉंक्रिटीकरणाचे काम करताना जुन्या डांबरी रस्त्यावर थेट सिमेंट कॉंक्रीट केल्यामुळे अनेक रस्ते तथा उड्डाण पुलांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचणे, मोठ्या वाहनांच्या अडथळ्यांमुळे रुग्णवाहिका, प्रवासी आणि माल वाहतूक ही तासंतास अडकून राहणे, डहाणू तालुक्यातील विवळवेडे, मॅढवण येथील उड्डाण पुलावर मोठ्या प्रमाणात पाणी साचून वाहतूक ठप्प होण्याची शक्यता निर्माण होणे, वाहतूक नियोजनासाठी कंत्राटदारांकडून कोणतीच उपाययोजना केली गेलेली नसल्यामुळे वारंवार अपघाताचे प्रमाण वाढत असणे, गुजरात व मुंबईकडील दोन्ही मार्गांवरील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी लोकप्रतिनीधी व जिल्हाधिकारी यांनी वारंवार बैठका घेऊन देखील कोणतीच उपाययोजना न होणे, निकृष्ट रस्त्यामुळे दिनांक ३१ मे, २०२५ रोजी मॅढवन-खिंडवर झालेल्या अपघातामध्ये तीन निरपराध लोकांचा झालेला मृत्यू, रस्त्याचे काम निकृष्ट करणाऱ्या कंत्राटदारावर व सदर कंत्राटदाराला पाठीशी घालणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(११) श्री. अनिल पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"जळगाव शहरातील ऑप्टिकल दुकानांमध्ये नागरिकांच्या डोळयांच्या वैद्यकीय उपचाराची पध्दत अत्यंत क्रूर आणि संतापजनक असणे, चष्म्याच्या व्यवसायाचे रूपांतर एका अनियंत्रित 'बाजारात' झाले असून केवळ व्यावसायिक फायद्यासाठी तांत्रिक ज्ञान नसलेले लोक नेत्ररोग तज्ज्ञ बनून वावरत असणे, या सदोष तपासणीमुळे समाजात नेत्रविकारांचे प्रमाण वाढून नागरिकांना शारीरिक व मानसिक मनस्ताप सहन करावा लागत असणे, या प्रकरणात आरोग्य विभाग आणि आणि अन्न व औषध प्रशासकीय यंत्रणेने कमालीचा निष्काळजीपणा आणि दुर्लक्ष केल्याचे स्पष्टपणे निदर्शनास येणे, विनापरवाना डोळे तपासणी करणाऱ्या दुकानांवर अंकुश ठेवण्यात ही यंत्रणा पूर्णपणे अपयशी ठरलेली असणे, शासनाने या गंभीर विषयाची दखल घेऊन तात्काळ अशा अनधिकृत केंद्रांची चौकशी करून ती

बंद करावीत आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी नागरीकांकडून होत असेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१२) श्री. विकास ठाकरे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात मोठया प्रमाणात आर्थिक फसवणूकीचे सायबर गुन्हे घडत असणे, या फसवणूकीसाठी सोशल मिडीयाचा वापर होत असणे, सोशल मिडीयाच्या माध्यमातून विविध जाहिरातीव्दारे अमिषे दाखवून ही फसवणूक केली जात असणे, या आमिषांमुळे अनेक जणांची फसवणूक होत असणे, कित्येकदा या फसवणूक करणाऱ्या टोळया राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवरुन गुन्हे करीत असणे, त्यामुळे त्यांच्यावर कार्यवाहीसाठी मर्यादा येत असणे, अनेक गुन्हे उघडकीस येत नसणे, त्यामुळे शासनाने या आर्थिक फसवणूकीच्या सायबर गुन्हयांना प्रतिबंधासाठी बहुवर्षीय राज्यव्यापी सायबर पूर्वसूचना, इशारा व नागरीक जनजागृती चौकट तयार करण्याची आवश्यकता, मात्र शासनाकडून कार्यवाहीत होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील जनतेत निर्माण होत असलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१३) श्री. संजय उपाध्याय, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"मुंबई शहरात विशेषत: बोरीवली परिसरात अंमली पदार्थांचे वाढत असलेले प्रमाण, विविध भागात ड्रग्स, मद्यपान करणे, सिगारेट व इतर अंमली पदार्थांची विक्री खुले आम होत असल्याच्या तक्रारी नागरीकांकडून सातत्याने होत असणे, ही परिस्थिती केवळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न नसून समाजाच्या नैतिक व सामाजिक आरोग्याशी निगडीत असणे, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात फळे, मिठाई, मिंट इत्यादी फ्लेवरयुक्त वेप उत्पादने लहान मुलांना आकर्षित करणे, तसेच ई-सिगारेटची (वेप) अवैध खुलेआम विक्री होत असल्याने विशेषत: शालेय/कॉलेजचे विद्यार्थी याच्या विळख्यात अडकणे, त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक वातावरणावर, कुटुंबव्यवस्थेवर तसेच समाजातील सुरक्षिततेवर याचा परिणाम होणे, या संदर्भात प्रशासनाकडे माहिती असतानाही अपेक्षित कार्यवाही न झाल्यामुळे नागरीकांच्या मनात खंत व्यक्त होणे, झेपटो, ब्लिंकइट यांसारख्या ऑनलाईन वितरण प्रणालीव्दारे अंमली पदार्थ सेवनासाठी वापरले जाणारे विविध साहित्य सहज उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे नागरीकांकडून ऑनलाईन विक्री करण्यास बंदी घालण्याची होत असलेली मागणी, मुंबई क्राईम ब्रँचने सन २०२५ मध्ये दहीसर, सांताक्रुझ, कालबादेवी, कम्बाला हिल इत्यादी ठिकाणी चीनमधून तस्करी केलेल्या रुपये ३२ लाखांच्या ई-सिगारेट मुद्दे मालासह जप्त करणे, मुंबईसह राज्यभरातील शाळा-कॉलेजांच्या ५०० मीटर परिसरात व सार्वजनिक ठिकाणी विशेष तपासणी मोहिम राबवून अवैध विक्री करणाऱ्या दुकानांवर, पुरवठादारांवर व ऑनलाईन विक्रेत्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, डब्ल्यू/सीडीसी डेटा व चीन तस्करीच्या धोक्यावर आधारीत

व्याख्याने, सोशल मिडीया अभियानाव्दारे शालेय/कॉलेजच्या विद्यार्थी/पालक तसेच जनतेमध्ये जन-जागृती मोहीम राबविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१४) श्री. शंकर जगताप, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पिंपरी-चिंचवड शहराची वाढती गरज लक्षात घेता मुळशी धरणातून ७६० एमएलडी पाणी मिळावे अशी मागणी महानगरपालिकेने दिनांक २ डिसेंबर २०२३ मध्ये शासनाकडे करणे, शहरातील प्रत्येक व्यक्तीस प्रतिदिन १३५ लिटर पाण्याची गरज भासणे, सध्या पवना धरणातून ५१० एमएलडी आणि एमआयडीसी कडून ३० एमएलडी आणि आंध्रा धरणातून ७० एमएलडी एवढे असा दररोज ६१० एमएलडी पाणी दिवसा उद्योग नगरीत नागरिकांना पुरविण्यात येणे, शहराची लोकसंख्या आगामी १० वर्षात दुप्पटीने वाढ होणे, पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये हिंजवडी, मान, मारुंजी, जांभे, नेरे, सांगवडे, गहुंजे या सात गावांचा समावेश झाल्यास शहराला पुरेसे पाणी मिळावे यासाठी पाण्याचे नियोजन करण्याची आवश्यकता, चिंचवड शहराच्या पिण्याच्या पाण्याचे ऑडिट करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर आणि पाण्याचे स्त्रोत्र याबाबत कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून एकत्रित अहवाल तयार करणे, मुळशी धरणातून बाहेर जाणाऱ्या पाण्याच्या मोजमापासाठी मीटर बसविणे, मुळशी धरणातील पाणी आरक्षित केल्यास तसेच धरणाची उंची वाढविल्यास पुणे शहरासह पिंपरी चिंचवड पीएमआरडी येथील रहिवाशांचा पाणी प्रश्न सुटण्यास मोठ्या प्रमाणात मदत होईल, नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत भामा आसखेड धरणातून १३७ एमएलडी पाणी उचलणे, शेतजमीन पाण्याखाली जाऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत पाटबंधारे विभागाकडून सविस्तर अहवाल तयार करून उद्योगनगरीला पाणीपुरवठा देण्याबाबत सकारात्मक उपाययोजना करण्याची आवश्यकता, मुळशी धरणातून महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार जलसंपदा विभागात २१५ एम.एल.डी. पाण्याची मागणी व आरक्षणाची मागणी, मुळशी धरणातील टाटा पॉवर मालकीच्या तीनशे मेगाब्लॉक क्षमतेचे हायड्रोपॉवर जनरेशन करार हा सन २०३१ मध्ये संपत असून त्यानुसार पिंपरी-चिंचवड पुणे सह पीएमआडीए हद्दीत वाढणारी लोकसंख्या लक्षात घेता आमाती ३० वर्षाचे नियोजन करण्यासाठी कमीत कमी १० टीएमसी पाणी उपलब्ध होण्याची व्यवहारता तपासण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१५) श्री. आदित्य ठाकरे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळामार्फत वरळी पुनर्विकास प्रकल्प हाती घेण्यात आला असून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणूक करण्यात येणे, उक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांमध्ये कोणकोणाची नेमणूक करण्यात आली तसेच सदर सल्लागार समितीने आपला अहवाल शासनास सादर केलेला असेल तर त्यावर शासनाने कार्यवाही करण्याची

आवश्यकता, त्याचबरोबर राज्यातील विविध जिल्हयातून (मुंबई शहर व उपनगरासह) भरती झालेले मुंबई पोलीस अधिकारी व अंमलदार, हवालदार आदिंना सेवानिवृत्त झाल्यानंतर मिळणाऱ्या तुटपुंज्या निवृत्तीवेतनातून मालकी हक्काचे मुंबई सारख्या शहरात घर घेणे शक्य नसल्याने त्यांना शहरात मालकी हक्काची घरे देण्याची आवश्यकता, त्याकरिता मुंबई उपनगरात मालकी हक्काची घरे उपलब्ध करुन देण्याबाबत स्वतंत्र व ठोस पोलीस हाऊसिंग धोरण जाहीर करण्यात यावे, तसेच पोलीस बाधवांनी स्थापन केलेल्या पोलीस परिवार गृहनिर्माण सहकारी संस्थांना मालकी हक्काचे घरे अथवा भूखंड देण्यासाठी विशेष सवलतीसह योजना राबविण्याची आवश्यकता, सेवानिवृत्त मुंबई पोलीस अधिकारी /अंमलदार व त्यांच्या कुटुंबियावर लादण्यात येणारे दंडणीय अनुज्ञाप्ती शुल्क पुर्णत: माफ करण्याची आवश्यकता, पोलीसांच्या मालकी हक्काच्या घरांसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर पोलीसासाठी घरे बांधण्यात यावी, सदर भूखंड खाजगी विकासकांच्या ताब्यात देण्यात येऊ नये अशी होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१६) श्रीमती देवयानी फरांदे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"नाशिक महानगरपालिका अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन पेस्ट सार्वजनिक ठिकाणची साफसफाई, पाणी पुरवठा, मल:निसारण, वाहन चालक पुरवठा आधी ठेकेदारी कर्मचाऱ्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन दिले जात असताना प्रति महिन्याला या स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून विशिष्ट रक्कम रोख स्वरूपात परत घेतली जात असणे, ठेकेदारी कर्मचारी म्हणून कामकाज करणारा कर्मचारी गरीब घरातील असल्याने त्याला कामाची नितांत आवश्यकता असणे, ठेकेदार तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून त्यांच्या गरजेचा गैरफायदा घेतला जात असणे, याबाबत लक्षवेधी सूचना क्रमांक १५४४ उपस्थित केली असता मा.मुख्यमंत्री यांनी याबाबत निश्चित यंत्रणा केली जाईल व गरीब कर्मचाऱ्यांची लूट होणार नाही याबाबत काळजी घेतली जाईल तसेच या प्रकरणात एसआयटी स्थापन केली जाईल असे आश्वासन देणे, माननीय मुख्यमंत्र्यांच्या आदेशानंतर अनेक कर्मचाऱ्यांनी नाशिक महानगरपालिकेकडे तक्रारी करणे, त्याचप्रमाणे पोलीस ठाण्यात देखील गुन्हा नोंदवण्यात येणे, परंतु या गरीब मुलांची आर्थिक अडवणूक करून त्यांनी केलेल्या तक्रारी मागे घेण्यासाठी ठेकेदार व त्यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तींकडून दबाव निर्माण होत असणे, या प्रकरणा संदर्भात अटकपूर्व जामीन मंजूर करताना कर्मचाऱ्यांच्या लाभात कुठलाही हस्तक्षेप करू नये असे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले असताना देखील सदर जामीन रद्द करून कारवाई केली जात नसणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१७) श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"हद्दवाढीला पर्याय म्हणून कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणे, मात्र स्थापनेनंतर आठ वर्षांचा कालावधी उलटूनही संबंधित ४२ गावांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव कायम असणे, केवळ बांधकाम परवानग्या देणे व किरकोळ कारवाई करणे यापुरते प्राधिकरणाचे कार्य मर्यादित असणे, कलम ४२ अंतर्गत स्थापन प्राधिकरणास शासनाचा थेट निधी उपलब्ध होत नसल्याने विकास कामे ठप्प होणे, त्यामुळे एमआरटीपी कायद्यातील कलम ४० अंतर्गत विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करून शासनाचा विशेष निधी, शासकीय जमिनींचे हस्तांतरण व स्वतंत्र विकास आराखडा मंजूर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने विशेष नियोजन प्राधिकरण घोषित करून निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१८) श्री. महेश लांडगे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पुणे मेट्रोपोलिटन रिजन हा राज्याच्या आर्थिक वाढीचा प्रमुख केंद्रबिंदू असणे, आयटी उद्योग, ऑटोमोबाईल क्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक गुंतवणुकीमुळे पुणे, पिंपरी-चिंचवड तसेच आजूबाजूच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झालेले असणे, Pune Metropolitan Region Development Authority (PMRDA) कार्यक्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना मूलभूत पायाभूत सुविधांची उभारणी मात्र त्या वेगाने झालेली नसणे, प्रमुख मार्गावर तीव्र वाहतूक कोंडी, इंद्रायणी, पवना, मुळा नदीचे वाढते प्रदूषण, हवा व पाणी प्रदूषणात वाढ, अनियोजित बांधकामे व विकासकामे, औद्योगिक क्षेत्रात मूलभूत सुविधांचा अभाव, वाढत्या मागणीमुळे वीज वितरण यंत्रणेवर ताण, Maha Metro मार्फत पुणे मेट्रो सुरू असून संपूर्ण PMR क्षेत्र अद्याप विस्तारीत झालेले नसणे, हिंजवडी, चाकण, तळेगाव, वाघोली, लोणीकंद या भागांसाठी मेट्रो विस्ताराचा कालबद्ध कार्यक्रम, रिंगरोड व मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब प्रकल्पांची सद्यस्थिती काय असा प्रश्न पडणे, PMPML सक्षम करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता, इंद्रायणी, पवना, मुळा या नद्यांचा उगम ते संगम असा नदीसुधार कार्यक्रम हाती घेऊन सर्वच नद्याचे जतन आणि संवर्धन करण्याची आवश्यकता, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांची क्षमता वाढविण्याची तसेच MIDC क्षेत्रातील औद्योगिक सांडपाणी नियंत्रण करण्याची आवश्यकता, वाढत्या वाहनसंख्येमुळे हवा प्रदूषण कमी करण्यासाठी शासनाने धोरण आखण्याची आवश्यकता, ग्रामीण भागात वाढत्या शहरीकरणासाठी स्वतंत्र नियोजन यंत्रणा उभारणे, बेकायदेशीर बांधकामांवर गेल्या तीन वर्षांत कोणत्या प्रकारची कारवाई केली याचा अहवाल सादर करणे, नवीन औद्योगिक क्लस्टर नियोजन करणे, नवीन उपकेंद्रे उभारणीचा आराखडा तयार करणे, सौर व पर्यायी ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष

योजना आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(१९) श्री. रोहित पाटील, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"सांगली शहरात तसेच तासगाव व विटा (जि. सांगली) परिसरामध्ये अमली पदार्थांचे वाढत असलेले जाळे, विटा एम.आय.डी.सी. परिसरात पोलिसांनी १४.५ किलो मेफेड्रोन नावाचे ड्रग्ज जप्त करत सुमारे २९ कोटींचा मोठा ड्रग्ज उत्पादन रॅकेट उद्ध्वस्त करणे, जिल्हा स्तरावर अमली पदार्थांचे उत्पादन व वितरण साखळी सक्रिय असल्याचे उघड होणे, परंतु जिल्ह्यामध्ये बाहेरून येणारे अंमली पदार्थाचे जाळे देखील प्रस्थापित झालेले असणे, त्याचप्रमाणे तासगाव तालुक्यात ग्रामीण भागात गांजाची लागवड व जप्तीच्या घटना समोर आल्याने अमली पदार्थांचे जाळे लहान शहरांपासून गावांपर्यंत पोहोचल्याचे दिसून येणे, अंमली पदार्थांच्या सेवनामध्ये अल्पवयीन मुलांचा वाढता सहभाग, शाळा-महाविद्यालयीन वयोगटातील युवक व्यसनाधीनतेकडे वळत असल्याची बाब उघडकीस येणे, व्यसनाधीनतेमुळे चोरी, मारामारी, लहान स्वरूपातील गुन्हे, टोळी संस्कृती व हिंसक प्रवृत्ती वाढत असल्याचा धोका निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने कडक पावले उचलन्याची आावश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२०) श्री. निलेश राणे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) तालुक्यातील आंब्रड सारमळे येथील धरणाचे काम मृद व जलसंधारण विभागामार्फत होत असून या कामाला १९९६ साली प्रशासकीय मान्यता मिळालेली असून ३० वर्षाचा कालावधी झालेला असतानाही अद्याप प्रकल्प पूर्ण झालेला नसणे, त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढत चाललेली असणे, यासंदर्भात विधानसभा सभागृहात विषय उपस्थित केला असता मा.मंत्री महोदयांनी प्रकल्पाच्या वाढीव खर्चाला तात्काळ प्रशासकीय मंजूरी देऊन धरणाच्या कामास सुरुवात करण्यात येईल असे आश्वासन दिलेले असतानाही अदयाप धरणाच्या वाढीव खर्चाला मंजूरी देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आलेले असणे, आंब्रड धरणासंदर्भात सभागृहात विषय उपस्थित केल्यानंतर फक्त एकदाच बैठक झाली त्यानंतर प्रत्यक्षात काम सुरु झाले असले तरी जुन्या कामाबाबत कुठलही ऑडीट झालेले नसणे, काम १०० टक्के निकृष्ट सुरु असणे, एकदाही कार्यकारी अभियंता, मुख्य कार्यकारी अभियंता हे प्रत्यक्षात काम सुरू असलेल्या ठिकाणी गेलेले नसणे, तसेच ठेकेदार पी. के. कोंडेकर याने धरणाच्या बुडीत क्षेत्रातच अधिकृतरीत्या काळया दगडाची क्वारी खोदून तो दगड विकून कोट्यवधींचा शासनाचा महसूल बुडवलेला असणे, धरणाचे झालेले काम अत्यंत निकृष्ट असून धरणाचा मुख्य बंधारा कित्येक फूट खचला असणे, दहा वर्षांनंतर बंधाऱ्यावर उगवलेल्या झाडांची तोड करण्यात आलेली असणे, प्रत्यक्षात झालेल्या कामापेक्षा जास्त देयकाची

रक्कम काढण्यात आलेली असणे, धरणात वापरल्या जाणाऱ्या मातीचे कुठलेही परिक्षण झालेले नसून उपलब्ध असेल ती माती धरणाच्या बंधाऱ्यात वापरली जात असणे, सदरील धरणाचे काम तात्काळ थांबवून झालेल्या कामाची चौकशी करावी, ठेकेदाराला काळया यादीत टाकून धरणासाठी नवीन ठेकेदार नियुक्त करण्यात यावा, तसेच कुडाळ तालुक्यातील भडगाव बुद्रुक येथील सुरू असलेल्या धरणाच काम हे ३०% पूर्ण झाले असून अद्याप शेतकऱ्यांना कुठलाही मोबदला मिळालेला नसणे, येथील शेतकऱ्यांची किमान ७ कोटी २३ लाखांची नुकसान भरपाई प्रलंबित असणे, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२१) श्री. महेश बालदी, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"सिडको महामंडळातील कारभाराबाबत अत्यंत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी समोर येत असणे, पाणी पुरवठा, गृहनिर्माण, १२.५% योजना, नैना प्रकल्प, बांधकाम परवानग्या तसेच कंत्राट वाटप या सर्वच स्तरांवर मोठया प्रमाणात अनियमितता व भ्रष्टाचार होत असल्याचे निदर्शनास येणे, विशेषत: सर्वसामान्य नागरीक व प्रकल्पग्रस्त शेतकरी यांना न्याय मिळत नसणे, यासंदर्भात प्रशासनाची भूमिका उदासीन व निष्क्रिय असणे, यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, सदर बाबींची शासनाने गांभीर्याने दखल घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २३ मार्च, २०२६.

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.